सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ३१ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## व्हिसा धारकांना दिलासा

वॉशिंग्टन : तात्पुरत्या व्हिसावर अमेरिकेत जाऊन बड्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या भारतीय तरुणांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकेच्या संसदेने स्थलांतरितांबाबत २२ मे रोजी घेतलेल्या निर्णयामुळे अनेक भारतीय विद्यार्थी आणि नोकरी करणाऱ्या आणि तिथेच स्थायिक होण्याची स्वप्न पाहणाऱ्या तरुणांच्या डोक्यावर त्यांचे करिअर आणि स्वप्न उद्ध्वस्त करणारी टांगती तलवार लटकत होती. मात्र, आता अमेरिकेने या निर्णयावरून यू-टर्न घेतला असून आता तात्पुरत्या व्हिसावर असलेल्या लाखो आयटी प्रोफेशनल्स आणि विद्यार्थ्यांना देश सोडण्याची गरज नसून, या नियमांमध्ये मोठे सकारात्मक बदल करण्यात आले आहेत.

## मेट्रोची क्षमता दुप्पट होणार

पुणे : मेट्रो लाइन १ आणि २वरील प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. येत्या काही महिन्यांमध्ये तिसरी मेट्रो मार्गिका सुरू झाली की ही संख्या ५० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. सर्व प्रवाशांना सहजपणे सामावून घेण्यासाठी महा मेट्रोने ट्रेनच्या डब्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काही महिन्यांमध्ये पुण्यात मेट्रोने प्रवास करणं आणखी सुखकर होणार आहे.

## महिलांनाही समान न्याय

मुंबई : नोकरी करणाऱ्या महिलांचे अधिकारी कोणीच नाकारू शकणार नाही. अलीकडेच लागू झालेल्या नवीन कामगार कायद्यानुसार महिलांनाही महत्त्वाचे फायदा मिळतील ज्यात नाईट शिफ्टसाठी गॅरंटीड सिक्युरिटी, 'समान कामासाठी समान वेतन' मिळण्याचा कायदेशीर हक्क आणि प्रसूती रजेनंतर घरून काम करण्याचा हक्क यांचा समावेश आहे.

## आयटी मॅनेजर बनली रिक्षाचालक

तिरुअनंतपुरम : केरळातील एका रिक्षा चालक महिलेशी झालेले एक साधे संभाषण अनपेक्षित प्रेरणादायी भेट ठरल्याचे एका उद्योजिकेने सांगितले. शांततापूर्ण जीवन जगण्यासाठी या महिलेने आयटी मॅनेजरचा प्रतिष्ठित आणि भरगच्च पगार असलेला जॉब सोडला. त्यानंतर तिने थेट रिक्षा चालवण्यास सुरुवात केली.

तब्बल नऊ वर्षे आयटी मॅनेजर म्हणून काम केल्यानंतर तिने ते क्षेत्र सोडलं. ती म्हणाली की, ती गेली ९ वर्षे आयटी मॅनेजर म्हणून कार्यरत होती, असे मिधलाज यांनी व्हिडिओ कॅप्शनमध्ये नमूद केले. नोकरीशी संबंधित असलेला दबाव, तणाव आणि सततची धावपळ मागे सोडल्याचे तिने सांगितले. कॉर्पोरेट विश्वातच रेंगाळत राहण्याऐवजी, या महिलेने एक पूर्णपणे वेगळा मार्ग निवडला आणि स्वतःची रिक्षा चालवण्यास सुरुवात केली.

# मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सरकार कायम सकारात्मक आणि पारदर्शक : मुख्यमंत्री




तभा वृत्तसेवा

नागपूर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषणाचा मार्ग स्वीकारला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत राज्य सरकार कायम सकारात्मक आणि पारदर्शक असल्याचे सांगितले. नागपुरात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा समाजासाठी आतापर्यंत सर्वाधिक निर्णय हे त्यांच्या आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतल्याचा दावा केला. मनोज जरांगे पाटील हे सध्या भर उन्हात उपोषणाला बसले आहे. यावर नागपूर इथं बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सरकारने या प्रश्नावर सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. मराठा समाजाच्या हितासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. जेव्हा जेव्हा अडचणी निर्माण झाल्या, तेव्हा सरकारने त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आणि सकारात्मक आहे. भविष्यातही मराठा समाजाच्या हिताचे निर्णय घेण्याची सरकारची भूमिका कायम राहणार आहे, असे त्यांनी सांगितले .

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमचं सरकार सर्व समाजाकरता सकारात्मक काम करणारे सरकार आहे. आम्ही कोणत्याही समाजाला एकमेकांपुढे आणून भांडण करत नाही. सगळ्यांचे चांगलंच होईल हा प्रयत्न करतो,मराठा समाजासाठीजेवढे निर्णय मी आणि शिंदे साहेबांनी घेतले एवढे इतिहासात कधी झाले नाही आणि पुढेही आम्ही मराठा समाजाच्या हिताचे निर्णय घेतच राहू. मात्र कोणताही निर्णय घेताना देशाचे संविधान, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे. या निर्णयाचा अवलंब न करता एखादा निर्णय घेतला तर त्यातून केवळ प्रसिद्धी मिळेल पण तो निर्णय टिकणार नाही. त्यामुळे संविधान आणि न्यायालयाचे निर्णय यांच्या कसोटीवर जे जे निर्णय त्यांच्या कसोटीवर खरे ठरणारे निर्णय असतील ते सर्व निर्णय आम्ही घेऊ. ओबीसी समाजाबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, एका समाजाचे हक्क काढून दुसऱ्या समाजाला देण्याची भूमिका सरकारची कधीच नव्हती आणि भविष्यातही राहणार नाही. ओबीसी समाजालाही घाबरण्याची आवश्यकता नाही, असे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सीएनजी, पेट्रोल आणि इंधन दरवाढीबाबत प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सध्या संपूर्ण जग ऊर्जा संकटाचा सामना करत आहे. इंधन तेलाच्या किमती जागतिक स्तरावर वाढल्या आहेत. अमेरिका आणि इतर अनेक देशांमध्येही इंधनाचे दर वाढलेले आहेत. पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी अधिक खर्च करावा लागत आहे. मात्र हे जागतिक संकट कमी झाल्यानंतर इंधनाचे दर पुन्हा कमी होतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

# भारत पुन्हा ॲक्शन मोडमध्ये !

## 'ऑपरेशन सिंदूर २.0' बाबत लष्करप्रमुखांचे मोठे वक्तव्य



तभा वृत्तसेवा

पुणे : भारत ऑपरेशन सिंदूर २.0 साठी तयारी करत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या कारवायांना प्रत्युत्तर म्हणून लष्कराची भूमिका कायम असल्याचे लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितले. लष्करप्रमुखांनी यावर जोर दिला की, ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे आणि सध्याच्या परिस्थितीला संघर्षातील तात्पुरता विराम म्हटले आहे.पाकिस्तानचे थेट नाव न घेता, जनरल द्विवेदी यांनी भारताच्या लष्करी सज्जतेवर प्रकाश टाकत एक जोरदार संदेश दिला. त्यांनी सूचित केले की, जर नवीन ऑपरेशनची आवश्यकता भासली, तर केवळ लष्करच नव्हे, तर हवाई दल आणि नौदलही पूर्णपणे तयार आहेत.

लष्करप्रमुख म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर २.0 झाल्यास, भारतीय लष्कर आणि तिन्ही सेवा त्यासाठी चांगली तयारी करत आहेत. सध्या, आम्ही तिन्ही सेवांमधील समन्वय वाढवण्यावर आणि पुढील युद्धासाठी स्वतःला तयार करण्यावर २४७ लक्ष केंद्रित करत आहोत. रणांगण इतके खुले आहे की प्रत्येक हालचाल समोरच्या बाजूला कळते. त्यामुळे, आपल्याला आपल्या सैनिकांची तैनाती, त्यांची सुरक्षा तसेच सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेबाबत अत्यंत सतर्क राहावे लागेल असे ते म्हणाले.

# तुकाराम मुंढेंचा धडाका!

## पुण्यात २२ बळी घेणाऱ्या विषारी दारूकांडाचे 'भिवंडी कनेक्शन' उघड



तभा वृत्तसेवा

पुणे : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात गावठी हातभट्टीची विषारी दारू प्यायल्याने २२ निष्पाप नागरिकांचा नाहक बळी गेला. या भीषण 'मृत्यू तांडवा'ने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असतानाच, अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाचा अत्यंत महत्त्वाचा धागा शोधून काढला आहे. एफडीएचे नवनियुक्त आणि धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर, प्रशासनाने थेट भिवंडी गाठून विषारी रसायनाचा एक प्रचंड मोठा साठा जप्त केला आहे.

या कारवाईमुळे अवैध केमिकल पुरवठा करणाऱ्या राज्यव्यापी रॅकेटचे धागेदोरे समोर आले आहेत.पुण्यात मरण पावलेल्या नागरिकांच्या शरीरात जे घातक केमिकल गेले होते, ते रसायन भिवंडीतून पुरवले गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. या माहितीच्या आधारे एफडीएच्या विशेष पथकाने भिवंडीतील 'मे. रेक्स इंटरनॅशनल' या कंपनीच्या गोदामावर अचानक धडक छापा टाकला. या कारवाई दरम्यान मानवी आरोग्यासाठी अत्यंत प्राणघातक ठरणाऱ्या 'मिथेनॉल' या रसायनाचा तब्बल ५,९२९ किलोग्रॅमचा बेकायदेशीर साठा जप्त करण्यात आला. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या या घातक रसायनाची कोणतीही अधिकृत नोंद किंवा खरेदी-विक्रीची पावती कंपनीच्या मुख्य नोंदवहीत आढळून आली नाही.पोलीस आणि एफडीएच्या संयुक्त चौकशीतून या मृत्यूच्या व्यापाराची संपूर्ण साखळी आता उजेडात आली आहे. भिवंडीच्या 'मे. रेक्स इंटरनॅशनल'मधून छुप्या मार्गाने बाहेर पडणारे हे मिथेनॉल थेट कर्नलसिंग विरका, मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे आणि उरळी कांचन येथील अवैध दारू विक्रेता राजू प्रजापती यांच्यापर्यंत पोहोचत होते. केवळ अधिक नफा कमवण्याच्या आणि दारूची नशा वाढवण्याच्या हव्यासापोटी या गुन्हेगारी त्रिकुटाने या रसायनाचा वापर करून हातभट्टीची विषारी दारू तयार केली, जिने २२ घरांचे संसार उद्ध्वस्त केले. अन्न व औषध प्रशासनाचा (ऋऊ) कार्यभार हाती घेताच सनदी अधिकारी तुकाराम मुंढे पूर्णपणे 'क्शन मोड'मध्ये आले आहेत. त्यांच्या कडक मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यातील एफडीए अधिकाऱ्यांनी विविध अन्न आस्थापनांची झाडाझडती सुरू केली आहे. या मोहिमेत ७ लाख ३० हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीचा संशयास्पद आणि आरोग्यास घातक असलेला साठा जप्त करण्यात आला आहे. प्रतिबंधित व भेसळयुक्त पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी ६ मुख्य आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला ४ लाख ५३ हजार ३४४ रुपयांचा इतर मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

# नागपुरात होणार कचऱ्यापासून गॅस निर्मिती

## देशातील पहिला प्रकल्प; ३०० कोटींची गुंतवणूक, प्रतिदिन २८ टन गॅसनिर्मितीचे उद्दिष्ट



तभा वृत्तसेवा

मुंबई : कचऱ्याची समस्या कायमची निकाली काढण्यासाठी नागपूर महापालिकेने स्तुत्य पाऊल उचलले असून, भांडेवाडी येथे देशातील पहिला एकात्मिक शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प साकारला जात आहे. संपूर्णपणे खाजगी गुंतवणुकीतून उभारल्या जाणाऱ्या या ३०० कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे नागपूर शहर कचरामुक्त होण्यास मोठी मदत होणार आहे. या अत्याधुनिक प्रकल्पाच्या माध्यमातून शहरातील दररोजच्या तब्बल १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार असून, त्यातून प्रतिदिन २८ टन बायोगॅसची निर्मिती केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केली. या प्रकल्पामुळे नागपूर हे घनकचरा व्यवस्थापनात देशासाठी आदर्श ठरेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. भांडेवाडी परिसरातील या प्रकल्पाला मुख्यमंत्र्यांनी शनिवारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. 'केवा सुस बडे' या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहातर्फे हा प्रकल्प उभारला जात आहे. याप्रसंगी महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीना हातीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दानी, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान आणि मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर प्रामुख्याने उपस्थित होते. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प एकूण तीन टप्प्यांत पूर्ण केला जाणार असून, येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत तो पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. शहरातून संकलित होणाऱ्या ओल्या आणि सुक्या कचऱ्यावर अत्यंत आधुनिक पद्धतीने प्रक्रिया केली जाईल. या प्रक्रियेनंतर केवळ बायोगॅस नव्हे, तर चांगल्या दर्जाचे कंपोस्ट खत आणि सुक्या कचऱ्यापासून 'पॉवर प्लेट्स' (इंधन) तयार केले जाणार आहे. या पॉवर प्लेट्सचा वापर 'महाजनको'च्या वीज केंद्रांसाठी ऊर्जा निर्माण करण्यासाठी केला जाईल. खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) सुरू होणाऱ्या या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिकेला कोणताही आर्थिक खर्च करावा लागणार नाही. उलट, शहरात दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनावर मनपाचा होणारा कोट्यवधी रुपयांचा दैनंदिन खर्च यामुळे वाचणार आहे. महापालिकेने या प्रकल्पासाठी ३० एकर जागा उपलब्ध करून दिली असून, उत्पादित होणाऱ्या गॅसच्या विक्रीतून मनपाला दरवर्षी १५ लाख रुपयांची रॉयल्टी देखील मिळणार आहे.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भाजपमध्ये प्रवेश



तभा वृत्तसेवा

मुंबई :विधानपरिषद निवडणुकीचा रणसंग्राम ऐन रंगात आलेला असतानाच महाविकास आघाडीला अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खंदे शिलेदार आणि माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अखेर 'कमळ' हातीघेतले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तनपुरे यांनी राहुरीचे नगराध्यक्ष आणि समर्थकांसह शनिवारी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून ऐनवेळी माघार घेतल्यापासूनच तनपुरे यांच्या राजकीय भूमिकेविषयी तर्कवितर्क लढवले जात होते, त्यावर आता अधिकृत शिक्कामोर्तब झाले असून, आगामी विधानपरिषद निवडणुकीत त्यांना अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या अक्षय कर्डिले यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला होता. त्यावेळी प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतल्याने भाजपचा मार्ग सुकर झाला होता. मात्र, त्याच निवडणुकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या संवादानंतर तनपुरे भाजपच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. पोटनिवडणुकीतील माघारीचे 'फळ' म्हणून आता त्यांना भाजपकडून विधानपरिषदेच्या रिंगणात उतरवले जाण्याची चिन्हे आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १ जून असल्याने, पुढील २४ तासांत अहिल्यानगरच्या राजकारणाला अत्यंत अनपेक्षित वळण मिळण्याची शक्यता आहे. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचे सख्खे भाचे आहेत. त्यामुळे या पक्षांतराची राजकीय वर्तुळात सर्वाधिक चर्चा आहे. भाजप प्रवेशाविषयी बोलताना तनपुरे म्हणाले, माझे मामा जयंत पाटील आणि आदरणीय शरद पवार यांना भेटायची माझ्यात हिंमत नाही, मी त्यांना याबाबत सांगितलेही नाही. मात्र, मतदारसंघातील अडचणी आणि ज्या कार्यकर्त्यांच्याजीवावर मी संघर्ष केला, त्यांच्या भावना लक्षात घेऊनच मला हा निर्णय घ्यावा लागला. सध्याच्या स्थितीत बोलणे देखील कठीण झाले आहे.

## अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत

नवी दिल्ली : इराण-अमेरिका-इस्रायल यांच्यातील युद्धाला तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. या काळात, तेलाच्या किमतीत झालेल्या तीव्र वाढीमुळे जागतिक चलनवाढीत मोठी वाढ झाली ज्याचे परिणाम आता अनेक देशांमध्ये जाणवू लागले आहेत. कॅनडाची अर्थव्यवस्था 'टेक्निकल' मंदीत सापडली आहे आणि फ्रान्सवरही संकट ओढवले आहे.




# मुंबईत १६ मार्गांवर धावणार 'जल मेट्रो'



तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबईत जल मेट्रो प्रकल्पातील पहिली मेट्रो मुंबईत दाखल झाली आहे. कॅन्डेला पी-१२ इलेक्ट्रिक हायड्रोफॉईल फेरी पहिली बोट जलविमान कंपनीच्या ताफ्यात दाखल झाली आहे. शहरातील जलवाहतुकीच्या विस्ताराच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. २७ मे रोजी दाखल झालेली ही बोट जवाहरलाल नेहरू बंदरात आहे. ही कस्टम क्लिअरन्सच्या प्रतीक्षेत असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणेंनी दिली आहे. मुंबई महानगर प्रदेशात सध्या जल मेट्रोचं जाळं विस्तारणार आहे. देशात डिसेंबर महिन्यापर्यंत पहिल्या टप्प्यात जल मेट्रोची वाहतूक सुरू होईल अशी घोषणा केली होती. त्यासाठीच आता हालचाली सुरू झाल्याचे दिसून येत आहे. कस्टम क्लिअरन्स मिळताच कॅन्डेलाची चाचणी केली जाणार आहे. या चाचण्या यशस्वी झाल्यावर पुढील निर्णय घेण्यात येईल. वाहत्या पाण्यातही या बोटमधून सुरक्षितपणे प्रवास करणं शक्य असल्याचा दावा विक्रेत्याने केला आहे. पण मान्सून तोंडावर असल्यामुळे सावधगिरी बाळगण्यासाठी या चाचण्या गरजेच्या आहेत. मुंबईतील जल मेट्रो प्रकल्पासाठी एकूण ११ कॅन्डेला पी१२ फेरी मागवल्या आहेत. या हाय-स्पीड इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल फेरीमधून ताशी ४० किमी वेगाने प्रवास करता येतो. एका वेळी या बोटीत ३० प्रवासी प्रवास करू शकतात. या फेरी सर्वप्रथम दोन मार्गांवर प्रवास करतील. पहिला मार्ग गेट वे ऑफ इंडिया ते अलिबाग असा असेल. पुढील मार्ग मांडवा ते वर्सोवा-मढ असा असेल.

मुंबई महानगर प्रदेशात जलवाहतुकीचे व्यापक जाळे विकसित करण्याच्या राज्य सरकाच्या योजनेचा हा एक भाग आहे. मुंबईत जल मेट्रोचं ३४० किमी लांब जाळं तयार करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे. यासाठी ६,५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याअंतर्गत महामुंबईत आधुनिक जलमार्ग, टर्मिनस आणि इलेक्ट्रिक फेरींचा विस्तार होणार आहे. मुंबईसारख्या वाहतूक कोंडी आणि लोकलमधील गर्दी असलेल्या शहरांमधील वाहतूक सुरळीत होणार आहे. या प्रकल्पात मुंबईमधील १२५ किलोमीटर लांब २१ मार्ग आणि २० स्थानकांचा विकास होणार आहे. त्याशिवाय २१५ किलोमीटर लांब नवे १६ जलमार्ग आणि २४ स्थानकंही उभारण्यात येतील. या प्रकल्पासाठी ३,४३६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी ३,१५६ कोटी रुपये २०१ इलेक्ट्रिक आणि हायब्रिड फेरी घेण्यासाठी खर्चले जातील. भारतातील १८ नव्या शहरांमध्ये जल मेट्रो सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात श्रीनगर, पाटणा, वाराणसी, अयोध्या आणि प्रयागराजमध्ये मेट्रो सेवा सुरू होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात आसाममधील तेजपूर आणि दिब्रुग-डला शहरांना जल मेट्रो मिळणार आहे. कोटी जल मेट्रोच्या यशानंगर या सर्व शहरांमध्ये विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी-पुणे ट्रॅव्हल्सची दुचाकीला भीषण धडक; मानवतचे ४ तरुण जागीच ठार, राहुल जिनिंगसमोरील घटना



**मानवत,/प्रतिनिधी :** परभणीकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका खाजगी ट्रॅव्हल्सने समोरील दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत दुचाकीवरील चार जण जागीच ठार झाले. हा थरारक अपघात २९ मे रोजी रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास येथील राहुल जिनिंग समोर घडला. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, मृतांपैकी एकाची ओळख पटवणे सुरुवातीला अत्यंत कठीण झाले होते.

मृतांची नावे:

अपघातातील सर्व मृत हे मानवत येथील रहिवासी असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

१. शुभम आप्पाराव दहे (वय ३० वर्षे), २. विष्णू गोरे (वय २८ वर्षे), ३. प्रल्हाद अशोकराव कुटे (वय २९ वर्षे), ४. नवनाथ शामराव जाधव (वय ३८ वर्षे), मिळालेल्या माहितीनुसार, एन एल ०१ बी १३७४ क्रमांकाची ट्रॅव्हल्स परभणीहून पुण्याकडे जात होती. दरम्यान, राहुल जिनिंग समोर समोरून येणाऱ्या एम एच २२ बी बी ४७२४ क्रमांकाच्या दुचाकीला ट्रॅव्हल्सची समोरासमोर जोरदार धडक बसली. अपघाताचे वृत्त समजताच सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) संदीप बोरकर, पोलीस उपनिरीक्षक (पोउनि) किशन पतंगे, प्रमोद देवकते आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने अपघातातील जखमी व मृतांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी तात्काळ कार्यवाही करत वाहतूक पूर्ववत सुरळीत केली. अपघातानंतर पोलिसांनी सर्व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मानवत येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहेत. रात्री उशिरापर्यंत रुग्णालयाच्या आवारात मृतांच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. एकाच गावातील चार जणांचा अशा अपघातात मृत्यू झाल्याने मानवत शहरासह परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलीस पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पाडत असून, शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केले जाणार आहेत.

### महानगरपालिकेत ज्येष्ठ नागरिकांसाठी जन्म प्रमाणपत्र सेवा पुन्हा सुरू : बी. रघुनाथ सभागृहात मिळणार सुविधा; नागरिकांच्या मागणीची दखल

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी जन्म प्रमाणपत्र सेवा पुन्हा सुरू करण्यात आल्याची माहिती महापौर सय्यद एकबाल यांनी शुक्रवारी २९ मे रोजी दिली. दुपारी आयोजित बैठकीत त्यांनी ही घोषणा केली.

यावेळी बोलताना महापौर सय्यद एकबाल यांनी सांगितले की, परभणी तहसीलदार संदीप राजापुरे यांच्याशी चर्चा तसेच नवीन शासन निर्णयानुसार ज्येष्ठ नागरिकांसाठी जन्म प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मागील काही काळापासून ही सेवा बंद असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक नागरिक, संघटना तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदने देऊन सेवा सुरू करण्याची मागणी केली होती.

नागरिकांच्या मागणीची दखल घेत महानगरपालिकेच्या वतीने ही सेवा पुन्हा सुरू करण्यात आली असून बी. रघुनाथ सभागृह येथे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासाठी महापौरांनी तीन संगणक व सात कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याची माहितीही दिली. महापौरांच्या दालनात झालेल्या बैठकीस आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, जन्म-मृत्यू विभागाचे संदीप पवार, स्वच्छता विभागाचे लक्ष्मण जोगदंड, अग्निशमन विभाग प्रमुख दीपक कानोडे, जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी विवाह नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करण्याबाबतही माहिती देण्यात आली. नागरिकांनी घरबसल्या ऑनलाइन सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर सय्यद एकबाल व आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांनी केले.

### परभणीत आज 'संबोधी'चा सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळा

**परभणी,/प्रतिनिधी :** संबोधी अकादमी, महाराष्ट्र यांच्या वतीने रविवार ३१ मे रोजी परभणी येथील महात्मा फुले विद्यालयाच्या प्रांगणात सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यात १०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द होणार आहेत. हा मंगल परिणय विधी बुध्द गया येथील महाबोधी महाविहारचे प्रमुख पूज्य भदंत हर्षबोधी महाथेरो, भीम जन्मभूमी मेमोरियल सोसायटी महूचे अध्यक्ष पूज्य भदंत धम्मदिप महाथेरो, खुरगाव येथील बुध्द विहार प्रमुख पूज्य भदंत पय्याबोधी थेरो, यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे.

या सामुहिक विवाह सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतूल सावे, जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष न्या. सि.एल. थूल, खासदार रामराव वडकुते, खासदार संजय जाधव, आमदार डॉ. राहुलजी पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई विजयकुमार वाकळे, महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री जयप्रकाशजी दांडेगावकर, माजी खासदार डॉ. फौजिया खान, माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, माजी आमदार सुरेशदादा देशमुख, डॉ. सिध्दार्थ भालेराव, इंजि. कुणाल कांबळे, मिलींद सावंत, गणेश राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रशासन, पोलीस, शिक्षण, आरोग्य व विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे राहुल रंजन महिवाल (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नतिशा माथुर (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली विवेक गायकवाड (भा.प्र.से.), कुलगुरू, जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी पंकज कुमावत (भा.पो.से.), अधिष्ठाता यासह अन्यअधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

# डिजिटल महसूल व्यवस्थेला नवे बळ

## परभणी तालुक्यातील ९ मंडळ अधिकारी व ५२ ग्राम महसूल अधिकाऱ्यांना लॅपटॉप-प्रिंटरचे वाटप

**परभणी,/प्रतिनिधी:-** डिजिटल लँड रेकॉर्ड मॉडर्निझेशन प्रोग्रॅम () अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण प्रक्रियेला अधिक गती देण्यासाठी परभणी तालुक्यातील ९ मंडळ अधिकारी आणि ५२ ग्राम महसूल अधिकाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप व प्रिंटरचे वितरण करण्यात आले. उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्या हस्ते हा वितरण सोहळा उत्साहात पार पडला.



महसूल विभागाच्या डिजिटल कामकाजासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता लक्षात घेऊन तलाठी संघटनेच्या माध्यमातून शासनाकडे गेल्या अनेक दिवसांपासून नवीन लॅपटॉप व प्रिंटरची मागणी करण्यात येत होती. शासनाने यापूर्वी सन २०१६ मध्ये लॅपटॉप व प्रिंटर उपलब्ध करून दिले होते. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानामुळे ती यंत्रणा कालबाह्य झाली होती. सुधारित ऑनलाइन प्रणालीवर काम करताना अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने शेतकरी व नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करणे कठीण बनले होते. आता नव्याने मिळालेल्या संगणकीय सुविधांमुळे महसूल विभागाचे कामकाज अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम होणार आहे. विशेषतः ई-फेरफार, ई-चावडी, ई-पीक पाहणी, सातबारा उतारे, फेरफार नोंदी, नवीन ई-पंचनामा प्रणाली तसेच नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप यांसारख्या महत्त्वाच्या सेवा अधिक सुलभपणे नागरिकांपर्यंत पोहोचणार आहेत. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी महसूल विभागातील डिजिटल सेवांचा विस्तार ही काळाची गरज असून, नवीन यंत्रसामग्रीमुळे नागरिकांना अधिक जलद व दर्जेदार सेवा देता येतील, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमास तहसीलदार संदीप राजपुरे, नायब तहसीलदार राजकुमार राठोड, मंडळ अधिकारी नंदकिशोर सोनवणे, शिवाजी मोरे, प्रवीण खाडे तसेच ग्राम महसूल अधिकारी बालाजी बिडगर, सोपान गुट्टे, उर्मिला गायकवाड यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेलू उपविभाग प्रशासनाचा संवेदनशील निर्णय; सहा गावांची पाणीटंचाई दूर, इतर गावांनाही तात्काळ मदतीची ग्वाही

**सेलू,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यात वाढत्या उन्हाळ्यामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी सेलू श्री. शैलेश लाहोटी यांनी संवेदनशीलता दाखवत सहा गावांसाठी तातडीने ११ पाणीटँकर मंजूर करून दिल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रशासनाच्या या जलद निर्णयामुळे कौसडी, बोरी, भोसी, हनवतखेडा, शेवडी व वाघी धानोरा या गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता निकाली निघाला असून ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार, कौसडी येथे ३ टँकर, बोरी येथे ४ टँकर तर भोसी, हनवतखेडा, शेवडी आणि वाघी धानोरा येथे प्रत्येकी १ टँकर मंजूर करण्यात आला आहे. आदेशानंतर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही सुरू करत संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती आणि टँकर कंत्राटदारांना कठोर व स्पष्ट निर्देश दिले आहेत. उपविभागीय अधिकारी श्री. शैलेश लाहोटी यांनी आदेशात नमूद केले आहे की, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पूर्णतः स्वच्छ, पारदर्शक आणि नियमित पद्धतीने व्हावा यासाठी प्रत्येक टँकरवरील टाक्यांची स्वच्छता, दररोज पाण्याची गुणवत्ता तपासणी, जीपीएस प्रणाली, लॉगबुक नोंदी, महिला सदस्यांच्या स्वाक्षऱ्या, ग्राम पाणी पुरवठा समितीचे निरीक्षण तसेच वेळापत्रकानुसार पाणी वितरण करणे बंधनकारक राहील. टँकरच्या प्रत्येक फेरीची नोंद जीपीएस प्रणालीवर होणे आवश्यक राहणार असून जीपीएसवर नोंद झालेल्याच फ ेऱ्यांचे बिल मंजूर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ग्रामस्थांची गैरसोय होऊ नये व टँकर आल्यावर गर्दीमुळे दुर्घटना घडू नयेत म्हणून नागरिकांना पूर्वसूचना देण्याचे आदेशही प्रशासनाने दिले आहेत. याशिवाय पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या खाजगी विहीर व बोअरवेल संदर्भातील अधिग्रहण प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. संबंधित विहीर मालकांची नोंद, ७/१२ उतारा आणि शासन निकषांची पूर्तता तपासूनच पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, उपविभागीय अधिकारी श्री. शैलेश लाहोटी यांनी पाणीटंचाईग्रस्त इतर गावांनाही दिलासा देत, संबंधित ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा प्रशासनाकडून पाणीटंचाईबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यास तात्काळ पडताळणी करून आवश्यक त्या टँकर मंजुरी देण्यात येतील, अशी ग्वाही दिली आहे. त्यामुळे जिंतूर तालुक्यातील इतर पाणीटंचाईग्रस्त गावांमध्येही प्रशासनाकडून सकारात्मक अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. उपविभागीय अधिकारी श्री. लाहोटी यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे आणि काटेकोर नियोजनामुळे प्रशासन नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार व्यक्त करत भविष्यातही अशाच तत्परतेने पाणीटंचाईचे प्रश्न सोडविण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत सेलू येथे १ जून रोजी बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** मा. भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम () दि. २० जून ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष प्रमुख व अमान्यता प्राप्त पक्ष प्रमुख यांची बैठक दि. ०१ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, सेलू येथे आयोजित करण्यात आली आहे.

संबंधितांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले आहे.

## मान्सूनपूर्व तयारीबाबत आरोग्य विषय समितीची बैठक संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीत आज आरोग्य सभापती वैशाली पंकज आंबेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विषय समितीची बैठक संपन्न झाली.

बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजयकुमार पांचाळ यांनी मान्सूनपूर्व तयारी संदर्भातील आरोग्य विभागाच्या उपाययोजनांची माहिती दिली. जिल्ह्यातील ८३० गावांपैकी २४४ गावे नदीकाठची असून ५४ गावे जोखीमग्रस्त असल्याने सर्व आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २४ तास मुख्यालयी सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.



जिल्हास्तरीय साथरोग पथक नियंत्रणात ठेवणे, ३७ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये साथरोग नियंत्रण कक्ष कार्यान्वित ठेवणे, अपेक्षित प्रसूती मातांची यादी अद्ययावत ठेवणे तसेच आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले. आरोग्य सभापती यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवेचे वेळापत्रक दर्शनी भागात लावावे, पिण्याच्या पाण्याची शुद्धता राखावी, रुग्णवाहिकांची उपलब्धता सुनिश्चित करावी तसेच आपत्कालीन संपर्क क्रमांक नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना केल्या. बैठकीस अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक संचालक कुष्ठरोग अधिकारी, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, कक्ष प्रमुख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठ लेखापाल तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

## ताडकळस परिसरातील शेतकऱ्यांद्वारे वाढीव पाण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** बी-६८ वरील लोहगाव उपविभाग क्रमांक ९ अंतर्गत येणाऱ्या शाखा क्रमांक १९ व २० ताडकळस कालव्यावरील क्षेत्रातील पिके पाण्याअभावी वाळून जात असून गुराढोरांच्या पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे तातडीने वाढीव पाणी उपलब्ध करून द्यावे व कालव्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यासंदर्भात जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी च्या कार्यकारी अभियंत्यांना शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. पाण्याअभावी शेती पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत चालल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कालव्यावरील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि वाढीव पाणी सोडून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. या निवेदनावर उपसभापती काशिनाथराव काळबांडे यांच्यासह मन्मथ नावकीकर, गजानन शिराळे, शिवधन शिराळे, वशिष्ठ मिसाळ, नागेश शिराळे, संजय शिराळे, विनोद शिराळे, कपिल नावकीकर, गजानन नावकीकर, बाळ शिराळे, उमाकांत शिराळे व आकाश शिराळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## इटोलीतील भीमनगर भागातील पाणीटंचाईवर तातडीची उपाययोजना

### पंचायत समिती सदस्य रंजना सांगळे यांनी स्वखर्चातून हातपंप दुरुस्त करून दिलासा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** इटोली गणातील नूतन पंचायत समिती सदस्या रंजना बालाजी सांगळे यांनी इटोली गावातील भीमनगर परिसरातील पाणीटंचाईची समस्या तातडीने सोडवून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. भीमनगर भागातील महिलांनी परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याची व्यथा मांडल्यानंतर त्यांनी त्वरित घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली.

भीमनगर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत असल्याचे लक्षात येताच रंजना सांगळे यांनी कोणतीही शासकीय मदत न वाट पाहता स्वखर्चातून परिसरातील बंद पडलेला हातपंप दुरुस्त करून घेतला. त्यामुळे परिसरातील महिलांसह नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून पाण्यासाठी होणारी दैनंदिन गैरसोय दूर झाली आहे.

यावेळी बोलताना रंजना सांगळे यांनी इटोली गणातील जनतेच्या मूलभूत समस्या सोडविण्यास आपण कटिबद्ध असून नागरिकांच्या अडचणींना प्राधान्य देत विकासकामांना गती देणार असल्याची ग्वाही दिली. तसेच गावातील पाणी, रस्ते, स्वच्छता व इतर नागरी सुविधांबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. या प्रसंगी इटोली येथील ग्रामस्थ दीपक कांबळे, बाळू साखरकर, बालाजी सांगळे, नागू हांडगे, बंडू गुंजकर, मनोहर घुगे, गौतम घुगे, उत्तम अंभोरे, बाबासाहेब घुगे, सिद्धार्थ साळवे, प्रभाकर गडदे, झोरे पठाण, फयाज पठाण, सल्लू पठाण आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनीही पाणीटंचाईच्या प्रश्नावर तातडीने दखल घेत हातपंप दुरुस्ती करून दिल्याबद्दल पंचायत समिती सदस्य रंजना सांगळे यांचे आभार व्यक्त केले.



## अग्रलेख...

# कर्नाटकी नाटक

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा देत डी. के. शिवकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग प्रशस्त केला, असे सकृद्दर्शनी दिसत असले तरी प्रत्यक्षात ते तसे आहे का, हा मोठा प्रश्न आहे. शुक्रवारी शिवकुमार यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड झालेली असेल. त्यानंतर ते राज्यपाल थावरचंद गहलोत यांची भेट घेत सरकार स्थापण्याचा दावा करतील. राज्यात काँग्रेसला बहुमत असल्यामुळे राज्यपाल त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी बोलावतीलही. एक दोन दिवसांत शिवकुमार मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, यात शंका वाटत नाही. मात्र त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग काटेरी दिसतो आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची सूचना करताना त्यांच्यासमोर राष्ट्रीय राजकारणात येण्याचा आणि राज्यसभेच्या जागेचा प्रस्ताव ठेवला आहे. सिद्धरामय्या यांचा मुलगा, डॉ. यतींद्रला, कॅबिनेट मंत्री करण्याचा प्रस्तावही बोनस म्हणून त्यांच्यासमोर आहे. पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनंतर सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असला तरी राष्ट्रीय राजकारणात येण्याची आणि राज्यसभेत जाण्याची सूचना फेटाळून लावत त्यात पाचर मारून ठेवली आहे. राष्ट्रीय राजकारणात येण्याची माझी इच्छा नाही, आणखी काही वर्षे मला राज्यातील जनतेची सेवा करायची आहे, असे ते म्हणाले. याचाच अर्थ सिद्धरामय्या राज्याच्या राजकारणात राहणार आणि नवीन मुख्यमंत्री शिवकुमार यांची डोकेदुखी वाढवणार, असे संकेत आहेत. आपल्या कृतीने ते शिवकुमार यांच्या मार्गात काटे पेरणार असल्याचे चित्र आहे.

सिद्धरामय्या यांच्यासमोर काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव ठेवला होता, असे म्हणतात. पण त्यांनी राष्ट्रीय राजकारणात पर्यायाने राज्यसभेत येण्याचे नाकारल्यामुळे सध्या राज्यसभेतील विरोधी पक्षनेते असलेले मल्लिकार्जुन खडगे यांचे समर्थक आपल्या नेत्याचे विरोधी पक्षनेतेपद वाचल्याबद्दल आनंदाने उड्या मारत असतील, तर शिवकुमार यांचे समर्थक आपले डोके फोडून घेत असतील. सिद्धरामय्या राष्ट्रीय राजकारणात म्हणजे दिल्लीला गेले असते तर शिवकुमार यांना शांतपणे आणि आपल्या हिशेबाने राज्याचा गाडा हाकता आला असता. आता मात्र तसे होण्याची शक्यता दिसत नाही. सिद्धरामय्या कर्नाटकात शिवकुमार यांच्या डोक्यावर बसत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राज्याच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कर्नाटक काँग्रेसमध्ये दोन गट होते, एक सिद्धरामय्या यांचा तर दुसरा शिवकुमार यांचा. शिवकुमार यांच्या सरकारमध्ये आपल्या गटाला एक उपमुख्यमंत्रिपद आणि १५ मंत्रिपदाची मागणी सिद्धरामय्या यांनी करत शिवकुमार यांचा रक्तदाब वाढवला आहे. सिद्धरामय्या यांचा डोळा प्रदेश अध्यक्षपदावर आहे, असे जाणवते. प्रदेश अध्यक्षपद आपल्याकडे घेत २०२८ च्या विधानसभा निवडणुकीत सत्तेची चावी आपल्या हातात ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असू शकतो. मुख्यमंत्रिपद सोडले तरी त्यांना राज्यात समांतर सत्ताकेंद्र उभे करायचे आहे, असे त्यांच्या हालचालींवरून दिसते. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवकुमार हे मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार होते. पण सिद्धरामय्या यांनी बाजी मारली. दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्याची संधी त्यांना मिळाली. शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाची आपली आकांक्षा कधी लपवून ठेवली नाही. वेळोवेळी ती व्यक्तही केली. मुख्यमंत्रिपदासाठी अडीच-अडीच वर्ष असा फॉर्म्युला ठरला होता, असा दावा शिवकुमार वारंवार करत होते, पण त्याला अधिकृतपणे दुजोरा सिद्धरामय्या वा काँग्रेसच्या नेतृत्वानेही दिला नाही. २०२८ मध्ये राज्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे काँग्रेसने राज्यात नेतृत्वबदल घडवून आणला, असे दिसते. सिद्धरामय्या यांचे वय झाले आहे, तसेच त्यांच्या सरकारविरुद्ध ॲण्टिइन्कमबन्सीही वाढली आहे, यात भरीसभर म्हणजे त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर भ्रष्टाचाराचे आरोपही झाले आहेत. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदल आवश्यक झाला होता. कर्नाटक हे दक्षिण भारतातील एक मोठे राज्य आहे. संपूर्ण देशातून काँग्रेसचे बारा वाजले असताना दक्षिण भारतातील तेलंगणा आणि कर्नाटक या दोन राज्यांतच काँग्रेसचे अस्तित्व आहे. त्यात आता केरळची भर पडली आहे. उत्तरेकडील हिमाचल प्रदेश या एकमेव राज्यात काँग्रेसचा सत्तेचा दिवा मिणमिणतो आहे. अन्यथा उर्वरित भारतात काँग्रेसच्या दृष्टीने सगळा आनंदीआनंद आहे. त्यामुळे कर्नाटक हे काँग्रेसच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण राज्य म्हणावे लागेल. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हेही कर्नाटकचे असल्यामुळे काँग्रेससाठी या राज्याचे महत्त्व आणखी वाढते.

राज्यपाल थावरचंद गहलोत राजधानीत नसतानाही त्यांच्या खाजगी सचिवाकडे राजीनामा देणाऱ्या सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत मागासवर्गीय आयोगाचा वादग्रस्त असा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अहवाल स्वीकारला आहे. राज्यात जातनिहाय जनगणनेला मान्यता देण्याचा हा अहवाल आहे. हा अहवाल अनेक वर्षे प्रलंबित होता. मुख्यमंत्रिपदाच्या आपल्या पहिल्या कार्यकाळात सिद्धरामय्या यांनी असा अहवाल स्वीकारला नव्हता. त्याऐवजी नव्याने सर्वेक्षण करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. या अहवालाला मान्यता देत सिद्धरामय्या यांनी शिवकुमार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाची डोकेदुखी वाढवली आहे. सिद्धरामय्या हे स्वत: ओबीसी समाजाचे नेते आहेत. एकप्रकारे त्यांनी या मुद्यावरून राज्यातील ओबीसींना आपल्या अधिकारासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा केला असे वाटते. काँग्रेसशासित राज्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील संघर्ष तसा नवा नाही. राजस्थानमध्ये आता काँग्रेसची सत्ता नाही. पण सत्ता असताना मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यातील संघर्षाने राज्यातील काँग्रेसचे सरकार अनेकवेळा अडचणीत आले होते. पण तेव्हा अशोक गहलोत यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची काँग्रेसच्या नेतृत्वाची हिंमत झाली नाही. परिणामी पायलट यांचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न स्वप्नच राहिले. अशीच स्थिती छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार असताना उद्भवली होती. तेव्हाचे मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि तत्कालीन मुख्यमंत्री टी. एस. सहदेव यांच्यातील संघर्षही असाच गाजला होता.

कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे वोक्कालिंग समुदायाचे आहेत. १९८९ पासून राज्याच्या राजकारणात ते सक्रिय आहेत. राज्यातील सर्वांत श्रीमंत नेता म्हणून त्यांची प्रतिमा आहे. काँग्रेससाठी अनेकवेळा त्यांनी संकटमोचकाची भूमिका बजावली आहे, काँग्रेसचे सर्वांत मोठे फंड मॅनेजर म्हणूनही ते ओळखले जातात. त्यामुळे त्यांना यावेळी मुख्यमंत्रिपदापासून वंचित ठेवणे किंवा त्यांच्या तोंडाला पाने पुसणे काँग्रेसच्या नेतृत्वाला शक्य झाले नसावे. काँग्रेससाठी संकटमोचकाची भूमिका बजावणाऱ्या शिवकुमार यांना काँग्रेससमोर नवे संकट निर्माण करणे फारसे कठीण नव्हते. त्यामुळे यावेळी कधी नव्हे ते काँग्रेसच्या नेतृत्वाने विशेषत: राहुल गांधी यांनी आपल्यात नसलेले राजकीय शहाणपण दाखवले आहे, असे म्हणावे लागते.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर शिवकुमार यांच्यासमोर एकीकडे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि त्यांच्या गटातील आमदारांना हाताळण्याचे तसेच नियंत्रणात ठेवण्याचे मोठे आव्हान राहणार आहे. सिद्धरामय्या सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात त्यांना ओबीसी नेता या प्रतिमेचा मोठा उपयोग करता येऊ शकतो. कर्नाटकात लिंगायत आणि वोक्कालिंग हे दोन प्रमुख समुदाय आहेत. राज्याचे राजकारण सामान्यपणे या दोन प्रमुख समुदायांच्या भरवशावरच चालत असते. राज्यातील आतापर्यंत बहुतेक मुख्यमंत्री एक तर लिंगायत वा वोक्कालिंग समुदायातून झाले आहेत. भाजपा नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री येदीयुरप्पा लिंगायत तर माजी मुख्यमंत्री तसेच माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हे वोक्कालिंग समुदायाचे आहेत. काँग्रेससमोर राज्यातील आपला जनाधार टिकवण्यासोबत तसेच आपल्या ताब्यातील आतापर्यंत इनमीनतीन असलेल्या पण आता चार राज्यांतील सत्ता टिकवण्याचे तसेच त्या राज्यांत गटबाजी वाढू न देण्याचे मोठे आव्हान आहे. कर्नाटकातील या नेतृत्वबदलाचा फायदा येत्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला होणार की भाजपा त्याचा फायदा घेणार, याचे उत्तर नजीकच्या काळात मिळणार आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# सूर्यावर किती काळ थुंकणार?

२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती भारतभरात साजरी झाली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, हे नाव उच्चारताच अनेकांच्या भुवया उंचावतात. काही लोक त्यांना महान देशभक्त मानतात, तर काही लोक त्यांना खलनायक ठरवण्याचा बळेबळे प्रयत्न करतात. पण एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे, ती म्हणजे सावरकरांना दुर्लक्षित करणे शक्य नाही. त्यांच्यावर होणारी टीका ही त्यांच्या कार्याची आणि विचारांची व्याप्तीच दर्शवते. २०१४ पूर्वी, एका विशिष्ट विचारधारेने सावरकरांना पद्धतशीरपणे बदनाम करण्याचा विडा उचलला होता. शासकीय स्तरावर त्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी होत नाही, शासकीय स्तरावर त्यांच्या साहित्याचा व चरित्राचा प्रचार केला जात नाही. तरीही सावरकर हे नाव भारतीय राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या केंद्रस्थानी कायम आहे. ही सावरकरवादाची ताकद आहे, हे सावरकरवादाचे यश आहे. आज देशाची वाटचाल सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या आणि इतर धोरणांनुसार होत आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. राष्ट्रीय सुरक्षा, सशक्त राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा विचार हे आजच्या भारताच्या धोरणांचे अविभाज्य भाग बनले आहेत. हिंदुत्व हा शब्द उच्चारला तर सर्वांत आधी सावरकरांची मूर्ती समोर उभी राहते. साधारण ठेंगणी अशी ही मध्यमवर्गीय मूर्ती आणि या मूर्तीने ब्रिटिश शासन हलवून लावले होते यावर विश्वास बसत नाही. पण हीच ती मूर्ती आहे, जिने क्रांतीची मशाल पेटवली, समाजाला दिशा दिली आणि राष्ट्राला एका नव्या उंचीवर नेले. त्यांच्यावर कितीही चिखलफेक केली तरी, त्यांच्या विचारांचा सूर्य अधिक तेजाने तळपत आहे.

सावरकरांचे कार्य केवळ सशस्त्र क्रांतीपुरते मर्यादित नव्हते, तर ते एक महान समाजसुधारकही होते. त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी केलेले कार्य हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि सामाजिक न्यायाच्या तळमळीचे प्रतीक आहे. ज्यांना गांधीजी 'हरिजन' म्हणत, त्यांनाच सावरकर 'पूर्वास्पृश्य' म्हणत आणि त्यांच्यासाठी प्रत्यक्ष कृती केली, केवळ भाषणे देत लोकांना भ्रमित करीत राहिले नाहीत. १९२९ मध्ये रत्नागिरीतल्या प्राचीन श्री विठ्ठल मंदिरात पूर्वास्पृश्यांचा प्रवेश घडवून आणणे, हे त्या काळात एक क्रांतिकारी पाऊल होते. त्यांनी पतितपावन मंदिराची स्थापना केली, जिथे सर्व हिंदूंना मुक्त प्रवेश होता. अखिल हिंदू उपहारगृहाची स्थापना करून त्यांनी जातीय भेदभावावर प्रहार केला. अस्पृश्यता हा मनुष्यत्वाचा अपमान आहे, हे त्यांनी ठामपणे मांडले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी सावरकरांच्या या कार्याची प्रशंसा करताना म्हटले होते की, येथे घडत असलेली सामाजिक क्रांती खरोखरच अपूर्व आहे. अंदमानात असतानाही त्यांनी निरक्षर कैद्यांना साक्षर केले आणि २००० पुस्तकांचे वाचनालय सुरू केले, ज्यामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आले. अंदमानातील मुस्लिमांच्या वर्चस्वाला आव्हान दिले. तिथे मुस्लिम हिंदू कैद्यांचे धर्मांतरण करायचे. सावरकर जाण्यापूर्वी मुस्लिमांचे प्रचंड वर्चस्व होते, पण सावरकर तिथून बाहेर पडताना अंदमानात एक हिंदू राष्ट्र निर्माण झाले होते.



सावरकर हे केवळ राजकारणी, लेखक नव्हते, तर ते एक तत्त्वज्ञानी, इतिहासकार आणि इतिहास घडवणारेही होते.

मात्र दुर्दैव असे की या महान विभूतीवर आजही सातत्याने टीका केली जाते. टीका करायला काहीच हरकत नाही. ते इतिहासपुरुष आहेत आणि त्यांचे विश्लेषण झालेच पाहिजे असे आम्हा हिंदुत्ववाद्यांचे प्रामाणिक मत आहे. पण खोटी टीका सहन केली जाणार नाही. त्यांच्यावर ब्रिटिशांची माफी मागितल्याचे आरोप केले जातात, जे त्यांच्या विरोधकांचे मुख्य शस्त्र बनले आहे. राहुल गांधी यांनी लंडनमध्ये केलेल्या भाषणावरून सात्यकी सावरकर (सावरकरांचे नातू) यांनी त्यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला आहे. या खटल्यात राहुल गांधी यांनी सावरकरांनी ब्रिटिशांची पाच वेळा माफी मागितली आणि गाईला केवळ उपयुक्त पशू मानले, असे आरोप केले होते. राहुल गांधींनी सात्यकी सावरकर यांच्या मातृवंशाच्या माहितीचा उल्लेख केला, जी न्यायालयाने फेटाळली. यावरून हे स्पष्ट होते की, सावरकरांना बदनाम करण्यासाठी किती खालच्या पातळीवर जाऊन प्रयत्न केले जात आहेत. फेसबुक आणि इतर सोशल मीडियावरही त्यांच्यावर सातत्याने खोटे आरोप केले जातात, त्यांच्या कार्याची बदनामी केली जाते. पण, या सर्व टीकेमुळे सावरकरांचे महत्त्व कमी होत नाही, उलट ते अधिक ठळकपणे समोर येते. त्यांच्यावर टीका करणारे हे विसरतात की, सावरकरांनी मातृभूमीसाठी किती त्याग केला, किती हालअपेष्टा सोसल्या. अंदमानच्या काळकोठडीत त्यांनी भोगलेले कष्ट हे संपूर्ण राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी होते. हिंदूंच्या कल्याणासाठी होते...

सावरकरांच्या विचारांची ताकद आजच्या भारताच्या धोरणांमध्ये स्पष्टपणे उमटलेली दिसते. सैनिकीकरण आणि हिंदुत्व हे शब्द आज केवळ कागदावर उरले नसून, ते राष्ट्रवादाचे मुख्य आधारस्तंभ बनले आहेत. सावरकरांनी पाहिलेले सामर्थ्यवान भारताचे स्वप्न आज सत्यात उतरताना दिसत आहे. सावरकरांचा विचार हा केवळ एका कालखंडापुरता मर्यादित नव्हता, तर तो युगानुयुगे देशाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ आहे. ज्यांनी अंदमानाच्या भिंतींवर काव्य लिहिले, ज्यांनी मृत्यूलाही आपल्या धैर्याने थक्क केले, त्यांच्या महानतेवर शंका घेणे हे स्वतःच्याच अज्ञानाचे प्रदर्शन करण्यासारखे आहे. सावरकर म्हणजे एक प्रखर धगधगते अग्निकुंड आहेत. होय आहेत, ते हिंदुत्वाच्या प्रखर राष्ट्र विचारांत जिवंत आहेत. तर या कुंडातून निर्माण होणाऱ्या विचारांच्या ज्वाला आजही आपल्या मनातील मरगळ झटकून आपल्याला राष्ट्रकार्यासाठी प्रवृत्त करतात. सावरकरांच्या विरोधात कितीही खोटे आरोप केले, कितीही फेसबुक पोस्ट्स लिहिल्या, तरी इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कोरलेले त्यांचे नाव पुसणे कुणालाही शक्य नाही. सावरकर हे केवळ एक व्यक्ती नसून ते एक चिरंतन मूल्य आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''की घेतले व्रत न आम्ही हे अंधतेने, लब्ध-प्रकाश इतिहास निसर्गमाने, जे दिव्य दाहक म्हणूनी असावयाचे, बुद्धयाचि वाण धरिले, करि हे सतीचे.'' हे सतीचे वाण घेऊनच आजचा भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि यातच सावरकरवादाचे सर्वांत मोठे यश सामावलेले आहे. त्यांच्यावर होणारी टीका ही सूर्यावर थुंकण्यासारखीच आहे; ती थुंकी उलट टीका करणाऱ्यांच्याच तोंडावर पडते. तुम्ही किती काळ सूर्यावर थुंकणार आहात? आणि स्वतःच्याच थुंकीने आपली तोंडे गलिच्छ करणार आहात? जर आम्ही हिंदुत्ववादी तुमच्या दिशेने एकत्रित थुंकलो तरी त्या थुंकीच्या त्सुनामीत तुम्ही वाहून जाल, नष्ट व्हाल... समजलं ना!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# क्रौर्यालाही लाजवणारी घटना!

२५ मे सोमवारचा दिवस. एक हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनेचे वृत्त कानावर पडले. क्रौर्यालाही लाजवेल, अशी ती घटना होती. एका बापाने आपल्या पोटच्या चार मुलांना शेतातील विहिरीत टाकून स्वत: देखील आत्महत्या केल्याची घटना जळगाव जा. तालुक्यातील अंजनगाव भालांजन या आदिवासी गावात घडली. ही बातमी ऐकून मन सुन्न झाले. डोक्यात विचारांचे काहूर माजले. असे काय घडले असेल की, त्या बापाने आपल्या पोटच्या चार मुलांना विहिरीत टाकण्याची दुर्दैवी वेळ त्याच्यावर आली? आपल्या मुलांची चूक झाल्यावर आपण थापडही मारत नाही, मात्र या बापाने त्याच्या मुलांना चक्क विहिरीत टाकले. या घटनेतील पिता विजय मुसा कराडिया याने त्याच्या पत्नीला तिच्या माहेरी सोडून आल्यावर हे क्रौर्य केले. पती-पत्नीत सतत वाद होत होता. घटनेच्या दिवशी देखील त्याच्या पत्नीने माहेरी सोडून देण्याचा हट्ट धरला. तिच्या हट्टापुढे त्याचे काही एक न चालल्याने त्याने तिला माहेरी सोडले. घरी परतल्यावर मुलांना शेतात फिरायला नेतो, असे त्याने त्याच्या वडिलांना सांगितले आणि शेतातील विहिरीत मुलांना टाकून स्वत: गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना केवळ एका व्यक्तीच्या मानसिक संतुलन बिघडण्याची नाही. तर, हा संपूर्ण समाजाच्या ढासळलेल्या मानसिकतेचा नमुना आहे. व्यसनातून पत्नीची हत्या केल्याच्या घटना घडतात. पण, या घटनेतील विजय कराडिया हा व्यसनी नव्हता. तो व्यसनमुक्तीचे समाज माध्यमांवरून लोकांना धडे देत होता. आदिवासींमध्ये व्यसनाधीनता जास्त प्रमाणात असलेली दिसते. पण, विजय त्याला अपवाद होता. आदिवासींनी दारूचे व्यसन सोडावे, यासाठी तो प्रयत्न करीत होता. त्याच्या मानसिक तणावाचे कारण त्याचा एकलकोंडा व शीघ्रकोपी स्वभाव असावा, असे पोलिस तपासात समोर आले आहे. पोलिसांनी त्याच्या जवळच्या नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीत त्याच्या स्वभावाबाबतची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून हे कारण या घटनेमागे असू शकते, असा पोलिसांचा अंदाज आहे. याचा अर्थ त्याचा गावात जास्त लोकांशी संपर्क नसावा. आजच्या काळात मित्र असतात. पण, ते मोबाईल व समाज माध्यमांवरच. प्रत्यक्ष संपर्क साधून मन मोकळे करण्यासाठी व मनातील दु:ख, चिंता व्यक्त करण्यासाठी चांगले मित्र असणे आवश्यक आहे. पण, आजच्या काळात केवळ व्हॉट्सॲप, इंटरनेटवर चॅटिंग करणे, रील पाहून स्क्रोल करण्यापुरतेच मित्र असतात. त्यामुळे माणूस आपल्या मनातील सुख-दु:खाच्या गोष्टी कोणाकडे व्यक्त करू शकत नाही. मनातल्या मनातच त्या साठवून ठेवल्या जात असल्याने अशा घटना घडतात. आज आपल्याकडे भौतिक सुख आहे. इंटरनेट, सोशल मीडियावर भरपूर मित्र आहेत. पण, मनातील दु:ख ज्याच्याकडे व्यक्त करू शकू असा माणूस आपल्याकडे नाही. माणूस आतून एकटा पडला आहे की, तो आपल्या मुलांचा जीव घेऊन स्वत: देखील आत्महत्या करण्याचा क्रूर निर्णय घेण्यापर्यंत जाऊ शकतो. केवळ संताप अनावर झाल्याने सुंदर संसार एका क्षणात मोडून टाकतो. या घटनेत पती-पत्नीच्या वादात त्या चार निष्पाप मुलांचा नाहक बळी देण्याचे काय कारण होते. त्या लहान जिवांनी तर हे जग पाहिलेही नव्हते. ज्या वयात त्यांच्या हातात खेळणे हवे होते, अभ्यासाची पुस्तके हवी होती. पण, त्यांना मिळाला हकनाक मृत्यू. ही केवळ हत्या आणि आत्महत्या नसून माणुसकीची हत्या म्हणावी लागेल. समाजात अजूनही मानसिक आरोग्याविषयी बोलण्याबाबत कमीपणा वाटतो. पुरुष महिलांप्रमाणे मनातील किंवा घरातील गोष्टींविषयी रडत बसत नाहीत. घरातील दु:ख बाहेर सांगत नाहीत. लोक काय म्हणतील याचा विचार त्यांच्या मनात सतत असतो. यामुळे मनातल्यामनात कुढत, गुदमरत राहतो. त्यामुळे नैराश्य, मानसिक ताण, कौटुंबिक हिंसा, आर्थिक विवंचना यांचा स्फोट होतो आणि एक दिवस अशी घटना घडते. समाज मात्र, अशा घटनांच्या कारणांची चर्चा करण्यापेक्षा प्रेत मोजत बसतो.

आज ग्रामीण भागात शेतकऱ्यांवर पडत असलेला आर्थिक ताण, बेरोजगारी, कुटुंबातील वाढत्या अपेक्षा, प्रत्येकाला मोठे घर, पैसा, प्रतिष्ठा, चैनीचे आयुष्य हवे आहे. मात्र, वास्तव जीवनात हाती अपयश येते. त्यातून न्यूनगंड, चिडचिड, संताप आणि शेवटी हिंसा घडते. मानसिक संतुलन हरवलेला माणूस स्वतःचा आणि दुसऱ्याचाही जीव घेण्यापर्यंत क्रूर होतो. अशा घटनांतील शोकांतिका म्हणजे समाजातील संवेदनशीलता हरवत चालली आहे. काही लोक मोबाईलवर व्हिडीओ पाहतात, सोशल मीडियावर इंग्रजीत आरआयपी लिहितात आणि पुढच्या क्षणी मनोरंजनाच्या रील्स पाहू लागतात. मृत्यू हा आता दु:खाचा विषय राहिलेला नाही. तो एक कंटेंट झाला आहे. प्रश्न केवळ त्या बापाचा नाही. प्रश्न आहे त्या वातावरणाचा, ज्याने त्याला एवढा अंधार दिला. घरात सतत आर्थिक विवंचना असेल, वाद होत असतील, मानसिक आधार नसेल, सतत अपमान होत असेल तर, माणूस आतून खचतो. खचलेला माणूस विचार करीत नाही. तो फक्त प्रतिक्रिया देतो आणि त्या प्रतिक्रियेत पाच जिवांचा अंत होतो. तेव्हा, ग्रामीण भागात गरज आहे समुपदेशनाची. मानसिक आधार देण्याची.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हे 'झुरळं' कुरवाळताहेत!

देशात सध्या एक विचित्र प्रकारचे राजकारण उभे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. काही विरोधक आणि त्यांच्या विचारांनी प्रेरित सोशल मीडिया टोळ्यांनी मीम्स, ट्रोलिंग, उपरोध आणि डिजिटल नाट्य यांच्या आधारावर स्वतःभोवती कृत्रिम लोकप्रियतेचे वातावरण निर्माण करण्याचा उद्योग सुरू केला आहे. स्वतःला 'कॉक्रोच जनता पार्टी' म्हणवून घेणाऱ्या या डिजिटल क्रांतिकारकांनी जणू देशातील तरुणाईचे प्रतिनिधित्व आपणच करतो, असा आव आणला आहे. पण प्रत्यक्षात या प्रकाराला डिजिटल तमाशाच म्हणावा लागेल. बरे या तमाशात मोठमोठे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते देखील सामील झालेले आणि 'झुरळं' कुरवाळताना दिसतात.

आज देशातील प्रमुख विरोधी नेते मग ते राहुल गांधी असोत, शरद पवार असोत की उद्धव ठाकरे या सर्वांची राजकीय अवस्था 'बुडत्याला काठीचा आधार' अशी झाली आहे. जमिनीवर ठोस मुद्दे, कणखर नेतृत्व आणि जनतेला विश्वास देईल असा कोणताही अजेंडा उरला नसल्यामुळे, या नेत्यांना आता अशा निरर्थक 'झुरळांच्या' प्रतीकांचा आधार घ्यावा लागत आहे. विरोधकांची ही स्थिती अत्यंत केविलवाणी आहे, जिथे देश चालवण्याचे व्हिजन मांडण्याऐवजी 'झुरळ' हेच त्यांचे राजकीय अस्त्र बनले आहे. काही विरोधकांनी आणि त्यांच्याशी संबंधित प्रचारयंत्रणांनी एका वक्तव्याचा संदर्भ तोडून-मोडून मांडत त्यावर कृत्रिम वाद निर्माण केला. त्याचा राजकीय इंधन म्हणून वापर करण्यात आला. राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीने या विषयाला संसदेपासून सोशल मीडियापर्यंत ताणण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीत टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. सरकारला प्रश्न विचारलेच पाहिजेत. पण एखाद्या संवैधानिक पदावरील व्यक्तीने केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करून त्याचे राजकीय भांडवल करणे, सोशल मीडिया आंदोलन उभे करणे आणि त्याला क्रांतीचे स्वरूप देणे, ही गंभीर बौद्धिक बेईमानी आहे. आणि एकप्रकारे त्या पदाचा अवमानदेखील आहे.

लोकशाहीत सशक्त विरोधकांनी उद्योग, शिक्षण, कौशल्य विकास, गुंतवणूक, स्टार्टअप्स, कृषी सुधारणा, तंत्रज्ञान शिक्षण यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. सरकारला धारेवर धरले पाहिजे, कोंडीत पकडले पाहिजे. पण मुद्दे सोडून विरोधकांनी विनोदाचा बाजार मांडला आहे. राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान'मध्ये आता झुरळांचे लोगो विकले जाऊ लागले आहेत. काही दिवसांत लाखो फॉलोअर्स मिळाले म्हणून एखादी गोष्ट लोकशाही चळवळ ठरत नाही. सोशल मीडिया हा वास्तवाचा पूर्ण आरसा नसतो. अनेक वेळा कृत्रिम ट्रेण्ड, संघटित प्रचार, बॉट नेटवर्क्स आणि भावनिक उत्तेजना यांच्या माध्यमातून वातावरण तयार केले जाते. भारतासारख्या देशात निवडणुका इन्स्टाग्राम रील्सवर जिंकल्या जात नाहीत. त्या जमिनीवरच्या कामावर जिंकल्या जातात. गावोगावी फिरून, जनतेचे प्रश्न ऐकून, संकटात उभे राहून विश्वास निर्माण करावा लागतो. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याला किंवा उद्धव ठाकरेंसारख्या माजी मुख्यमंत्र्याला जर आपली राजकीय नौका पार करण्यासाठी या 'कॉक्रोच ब्रॅण्डिंग'ची मदत घ्यावी लागत असेल, तर त्यांच्या मूळ विचारसरणीचे आणि राजकारणाचे किती अध:पतन झाले आहे, हे स्पष्ट होते.

देशाला व्हायरल राजकारण नको, तर व्हिजन असलेले नेतृत्व हवे आहे. एका बेरोजगार तरुणाला नोकरी हवी असते, मीम नाही. एका शेतकऱ्याला पाणी हवे असते, ट्रोलिंग नाही. एका विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण हवे असते, व्हायरल हॅशटॅग नाही. एका कामगाराला रोजगार हवा असतो, इन्स्टाग्रामवरचे नाटक नाही. हे समजून घेण्याइतकी सामाजिक जबाबदारी जर राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांकडे असती, तर वास्तविक ज्वलंत मुद्यांवर चर्चा उभी केली असती. त्यांनी शेती, रोजगार आणि आरोग्य यावर ठोस कार्यक्रम मांडले असते. पण दुर्दैवाने, त्यांना जनतेच्या प्रश्नांपेक्षा झुरळाच्या आडोशाने मिळणारी राजकीय प्रसिद्धी जास्त महत्त्वाची वाटत आहे. यांनी विनोद, खिल्ली आणि ट्रोलिंगचा मार्ग निवडला. भारतात प्रत्येक दुसऱ्या दशकात काही तात्पुरत्या क्रांती निर्माण होतात. सोशल मीडिया काही दिवस एखाद्या गोष्टीला डोक्यावर घेतो आणि मग दुसऱ्या विषयाकडे वळतो. आज कॉक्रोच जनता पार्टी ट्रेंडमध्ये आहे. उद्या दुसरा मीम येईल. परवा नवीन वाद येईल. पण देश चालवण्यासाठी स्थिरता, दृष्टी, अनुभव आणि जबाबदारी लागते, जी केवळ फेसबुक लाईव्ह किंवा ट्विटर वॉरमधून मिळत नाही. राजकारण म्हणजे मनोरंजन उद्योग नाही. लोकशाही म्हणजे 'स्टॅण्डअप कॉमेडी शो' नाही. संविधान म्हणजे ट्रोलिंगचा स्क्रिप्ट नाही. या स्वतःला डिजिटल बंडखोर म्हणवणाऱ्यांचे समाजासाठी काय योगदान आहे? भारताविषयी सगळे उच्चविचार विदेशात बसूनच का सुचतात? हा गंभीर प्रश्न आहे. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळसारख्या ठिकाणी 'जेन-झी'ची माथी भडकावून सत्तापालट झाल्याप्रमाणे भारततही तसा प्रयोग करू पाहणाऱ्यांना अपयशाशिवाय काहीही हाती लागणार नाही, हे वास्तव आहे. कारण देश सुरक्षित हातात आहे.

भारतीय तरुणाईला कोणी कमी लेखू शकत नाही. पण भारतीय तरुणाईची ओळख कॉक्रोच म्हणून करू नये. भारतीय युवकाला प्रेरणा हवी आहे, आत्मदया नाही. लोकशाहीत विरोध महत्त्वाचा असतो. सरकारवर टीका होणे गरजेचे असते. पण टीकेसोबत पर्यायही द्यावा लागतो. राहुल गांधींकडे देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी काय मॉडेल आहे? शरद पवारांकडे कृषी संकटावर काय उपाय आहे? उद्धव ठाकरेंकडे पायाभूत सुविधांच्या विकासाची काय योजना आहे? की फक्त मीम्स आणि झुरळांच्या घोषणांनी हे नेते देश चालवणार आहेत? दुर्दैवाने, राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे या विरोधी त्रिकुटाला भारतातील प्रत्येक समस्येला राष्ट्रनिराशेच्या अजेंड्यात रूपांतरित करायचे आहे. त्यांना उपायांपेक्षा असंतोष जास्त प्रिय असतो. कारण असंतोष विकला जातो. राग व्हायरल होतो. नकारात्मकता क्लिक मिळवते आणि त्यातूनच विरोधक आपली राजकीय दुकाने चालवू पाहत आहेत.

भारतीय जनता भावनिक असली तरी भोळी नाही. ती सोशल मीडियावर हसते, मीम्स शेअर करते, ट्रेंड्स बघते पण मतदान करताना ती विकास, स्थैर्य, सुरक्षा आणि विश्वासार्हता बघते. देश चालवणे आणि ट्रेंड चालवणे यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. बुडणाऱ्याला काठीचा आधार मिळावा, तसा विरोधकांना या झुरळाचा आधार मिळाला आहे. नेते, कार्यकर्ते सोडून जात असल्याने बुडत्या विरोधकांच्या हताश आधारावर उभे राहिलेले हे 'कॉक्रोच पुराण' विरोधकांच्या थट्टेचा विषय ठरत आहे.

९२७०३३३८८६

### शिरपूर-पुलगाव रस्ता दुर्लक्षित

वर्धा जिल्हा, देवळी तालुक्यातील पुलगाव ते शिरपूर हा सुमारे २२ किलोमीटरचा ग्रामीण भागातील अतिमहत्त्वाचा रस्ता खराब आहे. हा रस्ता जवळपास पन्नास साठ वर्षांपूर्वी बांधण्यात आला. इतके वर्ष लोटले परंतु हा जुना पण अतिमहत्त्वाचा ग्रामीण रस्ता वाहतुकीकरिता अजूनही योग्य नाही. हा रस्ता बांधकाम विभागातर्फे किंवा आतापर्यंतच्या कित्येक लोकप्रतिनिधींकडूनही दुरुस्तीबाबत दुर्लक्षित होत राहिला. वर्धा जिल्ह्यातील रेल्वेलाईन, सीएडी कॅम्पचे पुलगाव हे मुख्य शहर व नागपूर ते यवतमाळ राज्य महामार्गाला जोडणारा हा मुख्य ग्रामीण एकेरी रस्ता आहे. या रस्त्यावर नाचणगाव, इंझाळा, राघाळा, सावंगी विजयगोपाल, तांभा, रोहणी, तीर्थक्षेत्र श्री कोटेश्वर देवस्थान, उत्तर वाहिनी पवित्र वर्धानदी क्षेत्र इत्यादी महत्त्वाची गावे वा स्थानके आहेत. ग्रामीण भागातून शहरातील शाळेत, महाविद्यालयात जाण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांना तसेच शेतकऱ्यांना तालुका, जिल्ह्यात शासकीय कार्यालयात, बाजारपेठेत जाण्यासाठी हा एकमेव महत्त्वाचा रस्ता आहे. रस्ता अतिशय खराब असून, जागोजागी खड्डे असल्याने या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बस सुद्धा कमी धावते. एसटीच्या कमी शेड्युलमुळे प्रवाशांना चार ते पाच तासांची प्रतीक्षा करावी लागते. याच नादुरुस्त रस्त्यावरून काही ग्रामीण जनता आपल्या खाजगी मोटारकार, मोटारसायकल, सायकल, बैलगाडी इत्यादी वाहनाने त्रास भोगत नाईलाजाने प्रवास करतात. ग्रामीण जनक्षोभ टाळण्यासाठी शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने वर्धा जिल्ह्यातील देवळी तहसीलमधील या २२ किलोमीटर प्रमुख दुर्लक्षित रस्त्याचे किमान दोन पदरी व पक्क्या सिमेंट रोडचे त्वरित बांधकाम सुरू करावे, ही विनंती.

**किशोर पोहेकर**/नागपूर

### 'अंदमान एक तीर्थक्षेत्र' त्रिदिवसीय महोत्सव

सध्या नागपुरातील लक्ष्मी नगर येथील व्हॉलिबॉल ग्राऊंडवर 'अंदमान एक तीर्थक्षेत्र' हा त्रिदिवसीय महोत्सव सुरू आहे. हा महोत्सव म्हणजे नागपूरकरांसाठी पर्वणीच ठरला आहे. श्री सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी महापौर संदीप जोशी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव एक आकर्षण ठरला आहे. यात सेल्युलर जेलचा लाईट ॲण्ड साऊंड शो हे एक मुख्य आकर्षण ठरले आहे. स्थापत्य अभियंता प्रफुल्ल माटेगावकर यांनी सेल्युलर जेलची हुबेहूब प्रतिकृती तयार केली असून त्याचा शो हे उपस्थितांचे लक्ष वेधून घेते आहे. त्यासाठी त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भरपूर परिश्रम घेतले आहेत. त्यांचे अभिनंदन. त्यामुळे सध्या उष्णता उच्च बिंदूवर असून देखील प्रेक्षक प्रचंड गर्दी करीत आहेत. तसेच या तीन दिवसांत सावरकरांच्या जीवनावर, मूल्यांवर विचार प्रणालीवर आधारित उत्कृष्ट अशा व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजन केले आहे. हे प्रमुख आकर्षण आहे. याचा लाभ अधिकाधिक प्रेक्षकांनी आणि तरुणांनी घ्यावा. असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल माजी महापौरांचे आभार.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### ऑनलाईन तपासण्यांचा वाईट अनुभव

आजकाल रक्त आणि लघवीची तपासणी ऑनलाईन करणे शक्य झाले आहे. चाचण्या बुक करण्यासाठी अनेक कंपन्यांच्या वेबसाईट आणि आणि ॲप उपलब्ध आहेत. तपासणी ऑनलाईन बुक केल्यानंतर तंत्रज्ञ घरी येऊन रक्त/लघवीचे नमुने घेतात. तपासण्यांचे अहवाल मोबाईलवर पाठवले जातात. चाचण्यांचे अनेक पॅकेजेस पण उपलब्ध केलेले आहेत. माझ्या नातेवाईकाची लघवी तपासण्यासाठी पुण्याला ऑनलाईन बुकिंग करण्यात आले. तंत्रज्ञ घरी येऊन लघवीचा नमुना घेणार होता. मूत्रमार्गाच्या प्रादुर्भावासाठी करण्यात येणारी रुटीन आणि कल्चरची तपासणी करायची होती. तंत्रज्ञ घरी आल्यानंतर त्याने दिलेल्या प्लास्टिकच्या डबीत लघवी देण्यात आली. सोबत घरातल्या दुसऱ्या व्यक्तीची रक्त तपासणी पण करण्यात आली. दोघांच्या तपासणीची पूर्ण फी ऑनलाईन भरल्यानंतर तंत्रज्ञ निघून गेला. लघवीच्या रुटीन तपासणीला काही तास आणि कल्चरच्या तपासणीला दोन दिवस लागतात. लघवीच्या रुटीन टेस्टचा रिपोर्ट दोन दिवसांनी आणि कल्चरचा रिपोर्ट तब्बल पाच दिवसांनी प्राप्त झाला. रक्त तपासणीचा रिपोर्ट देण्यात आला नाही कारण रक्ताचा नमुना खराब झाला होता. लघवीच्या रिपोर्टला विलंब आणि रक्ताचा नमुना खराब होण्याचे कारण काय? जमा केल्यानंतर दोन दिवसांनी लघवीचा नमुना तपासल्यास अहवाल बरोबर येईल का? अनेकदा एकाचा अहवाल दुसऱ्याला देण्याच्या घटना पण घडलेल्या आहेत. रुग्णांच्या विश्वासाला तडा जाईल असे काम करणे योग्य आहे का? ज्या अहवालांच्या भरवशावर रुग्णाच्या रोगाचे निदान आणि उपचार करायचा असतो ते लवकरात लवकर मिळणे आणि विश्वासार्ह असणे आवश्यकच आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र रजिस्टर्ड फार्मासिस्टस् असोशिएशनचे अध्यक्ष कैलास तांदळे यांच्या सातत्यपूर्ण मागणीला मोठे यश

## नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी 5 लाखांचा अपघाती विमा कवच लागू



मुंबई (प्रतिनिधी) :महाराष्ट्र रजिस्टर्ड फार्मासिस्टस् असोशिएशन (MRPA)चे अध्यक्ष कैलास तांदळे यांच्या सातत्यपर्ण पाठपरावा, आंदोलन आणि मागणीला अखेर मोठे यश मिळाले असून महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौंसिल (MSPC)ने राज्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी ५ लाख रुपयांची अपघाती विमा योजना लागू केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो फार्मासिस्टना सामाजिक सुरक्षा कवच उपलब्ध होणार आहे.

फार्मासिस्टच्या हितासाठी अनेक वर्षांपासून कैलास तांदळे यांनी विविध स्तरावर पाठपुरावा केला होता. फार्मासिस्ट नोंदणी शुल्कातून जमा होणारा निधी हा फार्मासिस्टच्या कल्याणासाठी वापरण्यात यावा, अशी ठाम भूमिका त्यांनी सातत्याने मांडली होती. अखेर MSPCने या मागणीची दखल घेत विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला.

या योजनेमुळे राज्यातील ५ लाखांहून अधिक नोंदणीकृत फार्मासिस्टना अपघाती मृत्यू किंवा अपंगत्वाच्या प्रसंगी आर्थिक मदत मिळणार आहे. अचानक उद्भवणाऱ्या संकटाच्या काळात हा विमा फार्मासिस्ट आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

दरम्यान, या योजनेला भारतीय फार्मसीचे जनक महादेवलाल श्रॉफ यांचे नाव देऊन "महादेवलाल श्रॉफ फार्मासिस्ट सुरक्षा कवच विमा योजना" असे नामकरण करावे, अशी मागणीही राज्यभरातील फार्मासिस्टकडून जोर धरत आहे. "फार्मासिस्टला सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने संघर्ष केला. ही योजना म्हणजे राज्यातील फार्मासिस्टच्या एकजुटीचा विजय आहे," असे प्रतिपादन MRPAचे अध्यक्ष कैलास तांदळे यांनी केले.

# बेकायदेशीर ट्रान्सफॉर्मर शिफ्टिंग ठरली जीवघेणी; विजेच्या धक्क्याने पोखरी च्या तरुणाचा मृत्यू; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई : केज तालुक्यातील लाडेवडगाव येथे शेतातील ट्रान्सफॉर्मर (एचव्हीडीएस डीपी) दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे बेकायदेशीर काम करत असताना, वीज पुरवठा अचानक सुरू झाल्याने विजेचा तीव्र धक्का लागून संतोष सोनेराव निकम (वय ३८, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) या तरुण कामगाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

ही घटना मंगळवारी, २६ मे रोजी दुपारी लाडेवडगाव शिवारात घडली. कामाच्या ठिकाणी कोणतीही सुरक्षेची साधने न पुरवता, कमालीचा निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा करून मजुराच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी खाजगी कंत्राटदार सचिन भागवत शेप, शेतकरी सुभाष शाहूराव ढाकणे आणि महावितरणच्या एका लाईनमनविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



लाडेवडगाव येथील शेतकरी सुभाष ढाकणे यांच्या शेतात 'एक शेतकरी, एक ट्रान्सफॉर्मर' या योजनेअंतर्गत महावितरणची डीपी उभारण्यात आली होती. ही डीपी शासकीय नियम बाजूला ठेवून, शिफ्टिंग चार्ज वाचवण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय आणि त्यांना अंधारात ठेवून दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे काम खाजगी कंत्राटदार सचिन शेप याच्या माध्यमातून सुरू होते. या कामासाठी संतोष निकम यांच्यासह इतर तीन मजुरांना रोजंदारीवर बोलावण्यात आले होते.

काम सुरू करण्यापूर्वी वीज पुरवठा खंडित केल्याची खात्री करण्याचे काम लाईनमनचे होते.लाईनमनने वीज पुरवठा बंद असल्याचे सांगून तिथून पळ काढला, तर कंत्राटदार आणि शेतकऱ्याने संतोष यांना खांबावर चढण्यास सांगितले. संतोष सोनेराव निकम हे ट्रान्सफॉर्मरवरील मुख्य वायर सोडवण्यासाठी वर चढले असता, अचानक वीजप्रवाह सुरू झाला. विजेचा जोरदार झटका बसल्याने संतोष थेट खाली कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

कंत्राटदार लाईनमन यांचे घटनास्थळावरून पलायन

दरम्यान अपघातानंतर कंत्राटदार सचिन शेप घटनास्थळावरून आणि रुग्णालयातून पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी आणि पोखरी येथील ग्रामस्थांनी अंबाजोगाई येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालया समोर आक्रमक पवित्रा घेतला. दोषी कंत्राटदार, लाईनमन आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेत नातेवाईकांनी तीव्र आंदोलन केले.

अखेर महावितरणच्या धारूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गोकुळ मोरे आणि कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी दिलेल्या पत्रानंतर पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली. मृतक संतोष यांचे भाऊ प्रदीप सोनेराव निकम यांनी दिलेल्या जबाबावरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथांचे दर्शन

## माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले स्वागत



परळी वैजनाथ, प्रतिनिधी : शिवसेनेचे नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांनी आज श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथांचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी वैद्यनाथ नगरीत आगमन झाल्याबद्दल तमाम परळीकरांच्या वतीने त्यांचा माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या हस्ते हृदय सत्कार करण्यात आला.

दर्शनानंतर खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रभू वैद्यनाथांच्या चरणी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, जनतेच्या सुख-समृद्धीसाठी तसेच सर्वांच्या उत्तम आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना केली. त्यांच्या भेटीमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. शिंदे यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. परळी वैजनाथ येथे आपण यापूर्वीही दर्शनाला आलो होतो. प्रभू वैजनाथच्या दर्शनाने व परळीकरांच्या प्रेमाने आपण भारावून गेलो असल्याची भावना यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केली.

# बरकतनगर भागात सरस्वती नदी स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर; नगर परिषदेची मान्सूनपूर्व तयारी वेगात!



परळी वैजनाथ, प्रतिनिधी : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पूरस्थिती, पाण्याचा अडथळा आणि अस्वच्छतेचा त्रास होऊ नये यासाठी परळी वैजनाथ नगर परिषदेमार्फत बरकतनगर येथील स. नं. ७५ भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीची मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहे. मानसूनपूर्व सुरू असलेल्या या कामांची माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्यासह त्या प्रभागातील संबंधित नगरसेवक व न. प.पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या मोहिमेअंतर्गत नदीपात्रातील गाळ, कचरा, झुडपे तसेच पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरणारे घटक हटविण्याचे काम सुरू आहे. अनेक वर्षांपासून साचलेला गाळ काढून नदीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.सुरू असलेल्या कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कामाची गुणवत्ता, गती आणि स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. शहरातील विविध भागांमध्ये मान्सूनपूर्व नाले व नदी स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. स्वच्छ, सुरक्षित आणि पूरमुक्त परळी घडविण्यासाठी नगर परिषद कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आयुब पठाण, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे,नगरसेवक मोहसीन, नगरसेवक बब्बू, आदींसह पदाधिकारी तसेच नगर परिषद अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# 'संतोष देशमुख प्रकरणात साक्ष देऊ नकोस, प्रकरण मिटवून घ्यायला सांग'

## साक्षीदार दादा खिंडकरला सख्ख्या भावाकडूनच धमकी

बीड : बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख प्रकरणात आता एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक वळण समोर आले आहे. या प्रकरणातील साक्षीदार दादा खिंडकर याला या केसमध्ये साक्ष न देण्यासाठी आणि हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी त्याच्या सख्ख्या लहान भावानेच जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मृत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांचा साडू दादा खिंडकर हा संतोष देशमुख प्रकरणात कायदेशीर प्रक्रियेत सक्रिय आहे. दादा खिंडकर हा आपल्या घरी असताना, त्याचा लहान भाऊ समाधान खिंडकर हा त्या ठिकाणी आला. त्याने जुन्या वादाची कुरापत काढत दादा खिंडकरला थेट बजावले की, "तू धनंजय देशमुख यांच्यासोबत राहू नकोस आणि संतोष देशमुख प्रकरणात साक्ष देऊ नकोस. ते प्रकरण मिटवून घ्यायला सांग."

भावा-भावांमधील वाद चव्हाट्यावर

लहान भावाच्या या धमकीवजा इशाऱ्यावर दादा खिंडकरने, "तुला याच्याशी काय करायचे आहे? तू तुझे काम कर," असे उत्तर दिले. या उत्तराचा राग मनात धरून लहान भाऊ समाधान खिंडकर याने दादा खिंडकरला शिवीगाळ केली. या प्रकारानंतर दादा खिंडकरने थेट पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने दखल घेत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

तक्रारदार दादा खिंडकर आणि आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कौटुंबिक आणि इतर कारणांवरून वाद सुरू आहेत. दरम्यान, यापूर्वी काही तरुणांना मारहाण केल्याप्रकरणी दादा खिंडकर याच्यावरही गुन्हा दाखल झाला होता. मात्र, थेट हत्या प्रकरणातील साक्ष बदलण्यासाठी सख्ख्या भावानेच धमकी दिल्याने या प्रकरणाला आता वेगळेच वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आता या प्रकरणात आणखी काय माहिती समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# माजलगाव भाजपा संपर्क कार्यालयात सावरकर जयंती उत्साहात संपन्न



प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालय माजलगाव येथे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी

भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके म्हणाले स्वातंत्र्यवीर सावरकर हे प्रखर राष्ट्रभक्त आणि समाजजागृतीचे प्रेरणास्थान होते तर भाजपा युवा नेते अभय होके म्हणाले

सावरकरांचे राष्ट्रनिष्ठ विचार, त्यागमय जीवन आणि समाजप्रबोधनाचे कार्य आजही तरुणाईसाठी प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ आहे , याप्रसंगी सावरकर यांच्या आठवणीला उजाळा देत भारतीय जनता पार्टीचे तालुक्याचे शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी सावरकर यांनी देशाप्रती समर्पण भावनेने केलेले कार्य हे कोणीही विसरू शकणार नाही असे सांगितले. याप्रसंगी कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्ष रूपाली कचरे पाथरूड मंडळाचे तालुका अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके यांनीही सावरकरांचे विविध आठवणीला उजाळा देत विचार मांडून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पवन मोगरेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कल्याण शेप यांनी केले . या कार्यक्रम प्रसंगी उपाध्यक्ष शुभम महात्मे रामेश्वर चव्हाण संतोष जाधव किशोरजी सावंत सुनील दळवी सतीश जोशी रवि वाकळे गोपाळ कुलकर्णी सह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जन्मोत्सवाचे आयोजन

## पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण, महिलांच्या हस्ते महाआरती व अभिवादन सभा

माजलगाव (प्रतिनिधी )सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम दिनांक 31 मे रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 9 वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर सकाळी 10 वाजता समाजातील महिलांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाआरती तसेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील महिला भगिनींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन, सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड ,ॲड.जयराम सजगणे, रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, जयंत अध्यक्ष अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे, रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.

# अभिजित सुगावकर "रोटरी सक्षम" तर निवृत्ती तोडकर "रोटरी आत्मनिर्भर" पुरस्काराने सन्मानित



अंबाजोगाई : दिव्यांगत्वावर मात करत समाजात सक्षमपणे कार्यरत असलेले वैद्यनाथ बँकेचे व्यवस्थापक अभिजित सुगावकर यांना "रोटरी सक्षम" तर प्रयोगशील शेतकरी निवृत्ती तोडकर यांना रोटरी आत्मनिर्भर पुरस्काराने शाल,श्रीफळ, व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने आई फंगशन हॉल येथे वोकेशनल सर्व्हिस अवॉर्ड या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, उप प्रांतपाल प्रवीण देशपांडे, रोटरीच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, संगीता लातुरे, यांच्या हस्ते अभिजित सुगावकर व निवृत्ती तोडकर यांना सन्मानित करण्यात आले. अभिजित सुगावकर हे दिव्यगत्वावर मात करून गेल्या २५ वर्षांपासून वैद्यनाथ बँकेत ग्राहकांना सेवा देत आहेत. तर तोडकर यांनी आपल्या शेतीत गायगोठा,दूध उत्पादन, पशुखाद्य असे प्रकल्प ग्रामीण भागात सुरू केले. व आत्मनिर्भर शेतकरी कसा असावा. याचा प्रेरणादाई आदर्श समोर ठेवला.असे सुधीर लातुरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिणी पाठक यांनी केले.संचलन डॉ.प्रिया नागरगोजे यांनी तर उपस्थितांचे आभार वसुधा गडसिंग यांनी मानले.या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन बेवारसांना समाजसेवकांनी दिला कुटुंबीयांसारखा अखेरचा निरोप..!

बीड ( प्रतिनिधी ) : आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात नात्यांपेक्षा पैशाला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे अनेकदा दिसून येते. मात्र अशा परिस्थितीतही माणुसकी अजूनही जिवंत असल्याचे हृदयस्पर्शी उदाहरण बीड शहरात पाहायला मिळाले. दोन बेवारस मृतदेहांवर कोणताही वारसदार किंवा नातेवाईक पुढे न आल्याने बीड शहरातील समाजसेवकांनी पुढाकार घेत 30 मे 2026 शनिवार रोजी दुपारच्या दरम्यान त्यांच्यावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करून समाजासमोर माणुसकीचा एक आदर्श निर्माण केला.

मिळालेल्या माहितीनुसार, चकलंबा परिसरातील एक महिला भीक मागून आपला उदरनिर्वाह करत होती. प्रकृती खालावल्याने तिला उपचारासाठी बीड येथे दाखल करण्यात आले होते. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. उपचार सुरू असतानाच तिचे दुःखद निधन झाले. तिच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी कुणीही नातेवाईक किंवा ओळखीचे व्यक्ती पुढे आले नाहीत. त्यामुळे तिचा मृतदेह बेवारस अवस्थेत होता. याच दिवशी नेकनूर परिसरातील एका वयोवृद्ध आजोबांचेही निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीही कोणीही पुढे आले नाही. दोन मृतदेह आणि त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी कोणीच नसल्याची बाब समोर येताच बीड शहरातील समाजसेवकांनी तत्काळ पुढाकार घेतला. या दोघांनाही आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्यांच्यावर पूर्ण धार्मिक विधींसह सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेल्या समाजसेवकांच्या डोळ्यांतही अश्रू तरळले होते.

# विधान परिषद निवडणूक: उस्मानाबाद-लातूर-बीड मतदारसंघासाठी 32 जणांनी घेतली 60 नामनिर्देशनपत्रे

छत्रपती संभाजीनगर, 30 मे (हिं.स.) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. आतापर्यंत 32 इच्छुकांनी एकूण 60 कोरी नामनिर्देशनपत्रे प्राप्त केली असून दोन उमेदवारांनी अधिकृतपणे आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

भारत निवडणूक आयोग यांनी 18 मे 2026 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार उस्मानाबाद-लातूर-बीड मतदारसंघासाठी निवडणूक अधिसूचना 25 मे 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातून आजअखेर 32 व्यक्तींनी एकूण 60 नामनिर्देशनपत्रे घेतली आहेत. तसेच दोन उमेदवारांनी आपले अर्ज दाखल करून निवडणूक प्रक्रियेत अधिकृत प्रवेश केला आहे.

या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ दोन दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. इच्छुक उमेदवारांना सोमवार, 1 जून 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार आहे.

ही प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे पार पडणार असल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर यांनी दिली.

निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून पुढील दोन दिवसांत आणखी उमेदवारांकडून अर्ज दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत निवडल्या जाणाऱ्या या मतदारसंघाच्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# वैद्यनाथ नगरीत अधिक मासानिमित्त इष्टलिंग महापूजा; काशी जगद्गुरूंच्या उपस्थितीत 'मार्ग हा मुक्तीचा' ग्रंथाचे विमोचन

परळी वैजनाथ /प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त वैद्यनाथ ज्योतिर्लिंग नगरी परळीत गुरुवारी धार्मिक वातावरणात इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. काशी पीठाचे जगद्गुरू श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी गुरुवारी परळीत दाखल झाले. यावेळी त्यांच्यासोबत सोनपेठचे श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, श्री ष .ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महाराज वेळापुरकर तसेच अन्य शिवाचार्य उपस्थित होते. श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने अधिक मासानिमित्त श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वैद्यनाथ प्रवचन मंडपात इष्टलिंग महापूजा, त्यानंतर धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशी जगद्गुरूंच्या उपस्थितीत राज्यभर ३० दिवसांत ५० ठिकाणी इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले असून त्याच मालिकेतील हा परळीतील कार्यक्रम होता. धर्मसभेत मार्गदर्शन करताना काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले की, "इष्टलिंग पूजा करणाऱ्या भक्ताला अपेक्षित फलप्राप्ती मिळते. प्रत्येकाने दररोज स्नानानंतर वीरशैव बांधवांनी इष्टलिंगाची पूजा करून जल दाखवल्यानंतर भोजन करावे." त्यांनी 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथातील पाच सूत्रांचे विवेचन करत मुक्तीचा मार्ग समजून घेण्यासाठी ग्रंथ वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. अधिक मासाचे धार्मिक महत्त्व स्पष्ट करत त्यांनी भाविकांना ग्रंथ वाचनाचे आवाहन केले. इष्टलिंग महापूजेस मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यावेळी श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख, विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, डॉ. सुरेश चौधरी, श्री वक्रेश्वर देवस्थान मंदिराचे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे, श्री गुरुलिंग स्वामी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दत्तापा ईटके, नगरसेविका जयश्रीताई मोगरकर, माजी नगरसेविका उमाताई समशेट्टी, श्रद्धाताई हालगे, स्वाती अष्टेकर , शिक्षण समिती सभापती योगेश मेनकुदळे, श्यामभाऊ बुद्रे, रमेश चौंडे, विकास हालगे, नितीन समशेट्टी, अश्विन मोगरकर, नगरसेवक नितीन बागवाले, कार्यकर्ते चेतन सौंदळे, सोमनाथ गोपनपाळे, प्रकाश खोत, अनिल अष्टेकर, सचिन स्वामी, राजू तीळकरी, दत्तात्रेय गोपनपाळे, ओम प्रकाश बुरांडे, संजय खाकरे, संतोष जुजगर, रमाकांत बुरांडे, चंदू हालगे, रमाकांत गुजर, बबलू गोपनपाळे यांच्यासह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाणी विक्रेत्यांनी टँकरचे दर वाढविले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : सध्या शहरात पाणी विक्रीच्या व्यवसायातून मोठी उलाढाल होत आहे.

टँकर, ट्रॅक्टरद्वारे घरोघर जाऊन पाणी विक्री करणाऱ्यांनी यावर्षी भावही वाढविले. डिझेल दरवाढीने तर आणखी भाव वाढले असून, ज्यांची परिस्थिती चांगली आहे, ते विकत पाणी घेऊन वापरतात. ज्यांची परिस्थिती नाही, ते मिळेल तेथून पाणी उपलब्ध करून वापरत आहेत.

नळाला आठ दिवसांतून एकदा पाणी येते. अनेकांकडे पाणी साठविण्याची व्यवस्था नसल्याने ते महाग झालेले पाणी घेऊन वापरतात



## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी 'बेनिफिशरी सत्यापन ॲप'द्वारे डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे, २०२६ च्या शासन निर्णयानुसार, विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांसाठी आता हयात प्रमाणपत्र (डिजीटल लाईफ सर्टिफिकेट) ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लातूर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इतर सर्व विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र विहित पद्धतीने सादर करावे, असे आवाहन लातूर तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

मोबाईल किंवा सेतू केंद्रावरून सुविधा उपलब्ध

लाभार्थ्यांना हे प्रमाणपत्र सादर करणे सोपे जावे यासाठी 'बेनिफिशरी सत्यापन प' विकसित करण्यात आले आहे. लाभार्थी हे प्रमाणपत्र स्वतःच्या किंवा आपल्या नातेवाईकांच्या मोबाईलवरून या पचा वापर करून सादर करू शकतात. तसेच ज्यांना मोबाईलवर ही प्रक्रिया करणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्राला भेट देऊन आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र काढून घ्यावे.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक लाभार्थ्यांना ही ऑनलाईन प्रक्रिया स्वतः करणे शक्य नसते. अशा वेळी लाभार्थ्यांनी आपल्या नातेवाईकांची मदत घ्यावी अथवा जवळच्या सेतू सुविधा केंद्राचा लाभ घेऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी. जेणेकरून लाभार्थ्यांचे अनुदान विनाअडथळा सुरू राहण्यास मदत होईल, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# खाजगी शिकवणी वर्गांमुळे कनिष्ठ महाविद्यालयांनी विश्वासार्हता गमावली !

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर, दि. ३० मे : कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा अधिक झाली की ती नुकसानच करते,असे म्हटले जाते. मनुष्याचा स्वभाव, सत्ता, संपत्ती, पैसा यासह अनेक बाबींना हा मुद्दा लागू पडतो. लातूरला शिक्षणाची पंढरी समजले जाते. या पंढरीत खाजगी शिकवणी वर्गांच्या नावाखाली शिक्षणाचे बाजारीकरण सुरु झाले अन शिक्षणाचे पावित्र्याच जणू संपुष्टात आले. लातूरमधील खाजगी शिकवणी वर्गांच्या वाढत्या संख्येमुळे सद्यःस्थितीत येथील कनिष्ठ महाविद्यालयांनी आपली विश्र्वासार्हता गमावल्याचे दृष्टीपथास येत आहे. विद्यार्थी व पालकांनी याकडे आत्ताच डोळसपणे नाही पाहिल्यास नीट पेपर फुटीपेक्षाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही असा मतप्रवाह वाढीस लागला आहे.

मोह कधीही वाईटच. तो कोणाला, कधी आपल्या जाळ्यात ओढून घेईल याची शाश्र्वती नाही. ग्रामीण भागातून आलेल्या शिवराज मोटेगावकर नावाच्या बुद्धिमान तरुणालाही या मोहाने आपल्या जाळ्यात ओढले. धनाच्या अतिरिक्त लालसेने हा तरुण मानवाचा राक्षस कसा झाला हे कोणाच्याही लक्षात आले नाही.स्वार्थ माणसाला अंध बनवतो,असे म्हटले जाते. त्याची प्रचिती शिवराज मोटेगावकर नावाच्या तरुणाच्या नीट पेपर फुटी प्रकरणातील सहभागावरून आली. सीबीआयने या तपासाला आता गती घेतली आहे. त्यामुळे नीट पेपर फुटी कधीपासून सुरु झाली, त्यात आणखी किती जणांचा सहभाग आहे, आणखी किती ' मोहरे' सीबीआयच्या कचाट्यात जाण्यापासून सुटण्याचा प्रयत्न करत आहेत ? याचा सुगावा आगामी काळात लागणारच आहे. असंख्य तरुणांच्या भवितव्याशी, भावनांशी खेळणाऱ्या नराधमांना कोणत्याही परिस्थितीत माफी मिळालीच नाही पाहिजे,असा आग्रह समाजाच्या सर्वच क्षेत्रातून वाढताना दिसतोय.

लातूरच्या यशस्वी ' लातूर पॅटर्न' चा पुरेपूर लाभ हा पॅटर्न घडवणाऱ्यांपेक्षा स्वार्थी, संधीसाधू मंडळींनीच लुटला आहे, हे वास्तव आहे. ज्यांनी हा पॅटर्न घडवला त्यांनी पैशांपेक्षा विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचे काम प्रामाणिकपणे केले होते. परंतु त्याची दुकानदारी करणाऱ्यांचीच संख्या आजच्या काळात वाढली आहे. लातूर पॅटर्नची मुळे आठवी , नववी, दहावीत मजबूत केली गेली. त्या मुळांना तत्कालीन पॅटर्नकर्त्यांनी व्यवस्थित रुजविण्यासाठीची मेहनत घेतली. मुळातच बुद्धिमान आणि हुशार असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीकौशल्याच्या बळावर नेत्रदीपक यशही संपादन केले.

लातूरच्या मातीतच गुणवत्ता परिपूर्ण भरली असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. लातूरची माती गुणवत्तेची खाण असल्याचे आजही अभिमानाने नमूद केले जाते. अशा या लातूरमध्ये मागच्या काही वर्षांत खाजगी शिकवणी वर्गांचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले. पालकही आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण संस्थेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्याऐवजी स्वतःला नामांकित म्हणवून घेणाऱ्या खाजगी शिकवणी वर्गात प्रवेश घेण्यासाठी गर्दी करू लागले. या खाजगी शिकवणी वर्गासाठी विद्यार्थी पूर्णवेळ देऊ लागले. पण, त्यांना शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी अकरावी बारावीकरीता एखाद्या नाममात्र कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे आवश्यक होते. कारण, त्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. चांगल्या महाविद्यालयात केवळ नावालाच प्रवेश घेता येत नाही, तेथे उपस्थिती अनिवार्य असते.

अशावेळी लातुरात शिकण्यासाठी असंख्य पालकांनी खाजगी शिकवणी चालकांच्या आश्र्वासनाला भुलून शिक्षणाचा कोणताही दर्जा नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात आपल्या पाल्यांचे प्रवेश केले आहेत. असे हजारो विद्यार्थी आजही लातुरात आढळून येतात. जेथे खाजगी शिकवणी वर्गात विद्यार्थी दिवसभर हजेरी लावतात आणि नाममात्र प्रवेश घेतलेली कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थी हजर नसतानाही त्यांची उपस्थिती कागदोपत्री दर्शवण्यात मग्न असतात. याच कारणामुळे लातूर शहर परिसरात आजमितीस मोठ्या प्रमाणात कनिष्ठ महाविद्यालयांचे पेव फुटले आहे. ही बाब शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्यालक्षात येत नाही,असे नाही. मात्र, ते याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करण्याचे काम सातत्याने करत आले आहेत. यामागच्या कारणांचा शोध घेतल्यास ते कोणाही सुजाण नागरिक आणि पालकाच्या लक्षात येईल. हा विषय एकाच बातमीपुरता मर्यादित नाही. त्याच्या मुळाशी गेल्यास त्याचा पुरता थांग लागणार आहे. यावरून खाजगी शिकवणी वर्गांमुळे लातूर शहर परिसरातील अनेक कनिष्ठ महाविद्यालयांनी आपली विश्र्वासार्हता गमावल्याचे दृष्टीपथास येते.

## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## विधान परिषद निवडणुकीची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवरी निवडणुक आयोगाकडून प्रारुप मतदार यादी अधिकृतरित्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. या घोषणेमुळे तिन्ही ज्ह्यिांतील स्थानिक राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. सध्या मतदार यादी पडताळणीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. दुरुस्तीचे आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा पुरवठा सुरळीत; साठवणूक करू नका : जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून आगामी काळातही यात कोणताही खंड पडणार नाही, अशी हमी पेट्रोलियम कंपन्यांनी दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये तसेच अनावश्यक इंधनाची अतिरिक्त खरेदी किंवा साठवणूक करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील पेट्रोल व डिझेल पुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील पेट्रोल पंप असोसिएशनचे पदाधिकारी व पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील इंधनाच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्याला आवश्यक असणारा पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा नियमितपणे सुरू असून भविष्यातही हा पुरवठा असाच अखंडित सुरू राहील, अशी माहिती पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यावेळी दिली.

ग्रामीण भागात सध्या मान्सूनपूर्व शेती मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा सतत उपलब्ध ठेवण्यात यावा आणि शेती मशागतीच्या कामासाठी शेतकऱ्यांना, तसेच उद्योग-व्यवसाय आणि जलसंधारणाच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणात डिझेल तात्काळ उपलब्ध करून दिले जावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. पेट्रोलियम कंपन्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, जिल्ह्यात कुठेही पेट्रोल किंवा डिझेलचा तुटवडा निर्माण होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी प्रशासनाला दिली.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास न ठेवता अतिरिक्त स्वरूपात पेट्रोल किंवा डिझेलची खरेदी करू नये. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करून पेट्रोल पंपांवरील अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्हा प्रशासन सर्व पेट्रोलियम कंपन्या व पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ३० मे : संत गोरोबा सोसायटी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शुक्रवार (दि. २९) मोठ्या भक्तिमय वातावरणात करण्यात आली. या सप्ताहाची सुरुवात २२ मे रोजी करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यात महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या हस्ते शेवटची महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाला प्रभाग क्रमांक ३ चे नगरसेवक विकास कांबळे, भालचंद्र सोनकांबळे, संत गोरोबा सोसायटीचे चेअरमन सतीश कांबळे, संजय गव्हाणे, जनार्दन आप्पा कुंभार, प्रकाश पाटोळे, काशिनाथ वाघमारे, देविदास गायकवाड, विनायक कसबे, रमेश कांबळे, बब्रुवान उदारे, विलास कांबळे, लिंबराज मगर, हरी पवार, शाम गायकवाड, उत्तम कसबे, बळी गायकवाड, शिवाजी वाघमारे तसेच सप्ताह कमिटी, संत गोरोबा सोसायटीचे संचालक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सप्ताहामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजराने परिसर भक्तिमय झाला होता.

## आ. विक्रम काळे यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समितीच्या लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्याच्या प्रभारी म्हणून मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम वसंतराव काळे यांना महत्त्वपूर्ण जबाबदारी मिळाल्याबद्दल वसंतराव काळे खाजगी माध्यमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने वसंत विहार लातूर येथे पतसंस्थेचे

व्हॉईस चेअरमन युवराज शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रा. अंकुश नाडे, पतसंस्थेचे सचिव गफार सय्यद, कोषाध्यक्ष राजाराम भिसे, संचालक बंडू खोसे, राजकुमार जाधव, दत्ता कवडे, संचालिका प्रा. वैशाली फुले, बाबासाहेब भिसे, व्यवस्थापक राजाभाऊ सरडे, सुधाकर डिसले आदी उपस्थित होते.

## वाहतुकीस अडथळा; पिकअप जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : मुरूड बसस्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर अडथळा ठरेल अशा पद्धतीने वाहन उभे करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी एका पिकअप चालकाविरुद्ध मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ मे रोजी सायंकाळच्या सुमारास मुरुड बसस्थानकाच्या पश्र्चिमेस एका चालकाने आपली बोलेरो पिकअप (क्र. एमएच २४ एबी ७३८८) रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. यामुळे सार्वजनिक वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. पोलीस अंमलदार हनुमंत माने यांच्या फिर्यादीवरून या निष्काळजी चालकाविरुद्ध भादंवि कलम २८५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : जेएसपीएम संचालित आयटीआयचा कोर्स उत्तीर्ण झालेला मनोज भताने या विद्यार्थ्याने १२ परीक्षा समकक्षता या प्रस्तावानुसार १२ परीक्षा देऊन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. त्याबद्दल भाजपा नेते तथा भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी युवा नेतृत्व विश्वजित पाटील कव्हेकर, स्वामी विवेकानंद आयटीआयचे प्राचार्य एस.एम.पांचाळ, स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत गौड, जननायक संघटनेचे तालुका अध्यक्ष उध्दवराव काळे आदी उपस्थित होते.

# पेपर फुटीतील दोषींवर कठोर कारवाई करावी शिवसेना उबाठा पक्षाची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : देशभर गाजत असलेल्या नीट पेपर फुटीच्या केंद्रबिंदू स्थानी आल्याने लातूरची बदनामी होत आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

नीट पेपर फुटीनंतर लातूर शहरातील ज्या भागात खाजगी शिकवणी चालतात अशा उद्योग भवन परिसरातील शिक्षणाचा बाजार बंद करावा, त्या ठिकाणी चालणारे बेकायदेशीर कला असेच तात्काळ बंद करण्यात यावीत, ही कार्यवाही करीत असताना विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याचीही काळजी घ्यावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगर प्रमुख विष्णूपंत साठे, शिव आरोग्य सेनेचे जिल्हा समन्वयक त्र्यंबक स्वामी, शहर प्रमुख माधव कलमुकले, राजेंद्र कतारे, सोमनाथ झुंजारे, विष्णू कांबळे, भास्कर माने, कैलास पाटील, संतोष माने, लक्ष्मण पेटकर, निलेश मद्रेवार, सुभाष गुंडीले, मच्छिंद्र कांबळे, आकाश तिरूके, महादेव काळे, नेताजी ऐतनबोणे, गजानन होणराव, सतीश सावळे, संतोष घोडके, ऋषिकेश पाटील, अण्णा कोळी, जनार्दन हंचाटे, प्रमोद देशमुख, सुरज बाहेती आदी उपस्थित होते.

## ३० हजारांची दुचाकी लंपास !

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : घरासमोर उभी केलेली ३० हजार रुपये किमतीची टीव्हीएस अपाचे मोटारसायकल (क्र. एमएच २४ बीएन ३३१८) अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना हरंगुळ येथे घडली. या प्रकरणी सोहेल गणीसाब सय्यद (वय २४) यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही चोरी २५ मे रोजी दुपारी १२:३० ते रात्री ९:०० च्या दरम्यान घडली. पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार धुमाळ करत आहेत.

# १२६ विद्यार्थ्यांचा कॉक्सिटमध्ये सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : येथील कॉक्सिट महाविद्यालयात विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (आयटी) कॅम्पसमुलाखतीतून मोठ्या पॅकेजची नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थी व पालकांचा गौरव सोहळा माजीमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

येथील कॉक्सिटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजीमंत्री संजय बनसोडे, संस्थचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील,संस्थेचे नागोराव पाटील, जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जळकोटचे नगराध्यक्ष मन्मथप्पा किडे, विशेष कर्तव्य अधिकारी डॉ. ई. यू. मासूमदार, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, प्रा. जितेंद्र बनसोडे उपस्थित होते.

आ. बनसोडे म्हणाले,ग्रामीण विद्यार्थ्यांनी बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये मिळविलेले स्थान हे कौतुकास्पद आहे. त्यांनी या संधीचे सोने करून देशाच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे सांगून कॉक्सिटने मागील अनेक वर्षांपासून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात संगणकशास्त्राच्या रुपाने ज्ञानाचा दिवा लावण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच एकाच वर्षात तब्बल १२६ विद्यार्थ्यांना नामांकित आयटी कंपन्यांमध्ये मोठ्या पॅकेतजच्या नोकर्या मिळाल्या आहेत. डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात सर्व प्राध्यापकांनी घेतलेल्या परिश्रमाचे हे चीज आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समरोपात डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी सलग तीन वर्षे महाविद्यालयाच्यावतीने तयारी करून घेण्यात आली. कंपन्यांना हवे असलेलाच अभ्यासक्रम कॉक्सिटमध्ये शिकविला जातो. त्याचेच फलित म्हणजे म्हणून १२६ विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे फळ आहे, विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट जगतात संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी यांनी कॉक्सिटने घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे एकाचवेळी १२६ विद्यार्थ्यांना नोकर्या मिळाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले.

अद्यापही विप्रो या कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत निवड झालेल्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांच्या निवडी जाहीर होणार असल्याचे महाविद्यालयाच्यावतीने सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कार्स २४' ची फसवेगिरी दोन लाखांची भरपाई देण्याचे आदेश

## वकिलाशिवाय ग्राहकाने जिंकली लढाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

ऑनलाईन सेकंड हँड वाहन विक्री करणाऱ्या 'कार्स २४' कंपनीविरोधात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, नांदेड यांनी महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. विशेष म्हणजे तक्रारदार ओंकार श्यामसुंदर शिंदे यांनी कोणत्याही वकिलाची मदत न घेता स्वतः हा खटला लढवून न्याय मिळवला.

तक्रारदार ओंकार शिंदे यांनी डिसेंबर २०२३ मध्ये 'कार्स२४' मार्फत होंडा अमेझ कार खरेदी केली होती. वाहन विक्रीवेळी कंपनीकडून गाडी अपघातमुक्त असून ओडोमीटरमध्ये कोणतीही छेडछाड नाही असे सांगण्यात आले होते. मात्र वाहनात बिघाड झाल्यानंतर सर्व्हिस सेंटरमध्ये तपासणी केली असता गाडी पूर्वी अपघातग्रस्त असल्याचे आणि ओडोमीटरमध्ये फेरफार झाल्याचे समोर आले. त्यानंतर तक्रारदाराने स्वतः पुरावे, सर्व्हिस हिस्ट्री, इन्शुरन्स रिपोर्ट आणि इतर कागदपत्रे गोळा करून ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली. सुनावणीदरम्यान 'कार्स२४' कंपनीकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आयोगाने कंपनीची सेवा त्रुटी आणि अन्यायकारक व्यापार पद्धती सिद्ध झाल्याचे नमूद केले.आयोगाने 'कार्स२४' कंपनीला मानसिक त्रासापोटी २ लाख रुपये आणि तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये असे एकूण २ लाख दहा हजार रुपये ४५ दिवसांत देण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशाराही तक्रारदाराने दिला आहे.

ग्राहकांनी आपली फसवणूक झाली असे लक्षात आल्यास कोणत्याही वकिलामार्फत आपले गाऱ्हाणे न मांडता स्वतःही आपला लढा लढू शकतात हे सदरील प्रकरणावरून लक्षात येते.

# अमेरिकेच्या भूमीवर घुमणार समतेचा स्वर! पहिल्या 'डॉ. आंबेडकर बुद्ध महाविहारा'चा ३१ मे रोजी लोकार्पण सोहळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० मे -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जागतिक स्तरावर पोहोचवण्याच्या प्रवासातील एक सुवर्णक्षण जवळ आला आहे. अमेरिकेतील व्हर्मोंट (तशीर्पी) राज्यातील लोवेल शहरात उभारण्यात आलेल्या 'दि फर्स्ट अमेरिकन आंबेडकर बुद्ध महाविहार'या ऐतिहासिक वास्तूचा भव्य लोकार्पण सोहळा येत्या ३१ मे २०२६ रोजी संपन्न होणार आहे.



या ऐतिहासिक महाविहाराचा लोकार्पण सोहळा भारत, तेलंगणा येथील सुप्रसिद्ध भंते डॉ. शाकू बोधी धम्मा यांच्या पावन हस्ते संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी त्यांचे विशेष आगमन होत असून त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला मोठे आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती वर्षाचे आणि 'वैशाख पौर्णिमे'चे (बुद्ध पौर्णिमा) औचित्य साधून या महाविहाराचे लोकार्पण करण्यात येत आहे. अमेरिकेतील हे अशा प्रकारचे पहिलेच महाविहार असल्याने जगभरातील आंबेडकरवादी अनुयायांमध्ये कमालीचा उत्साह आहे. हा ऐतिहासिक सोहळा ७५१ पेज रोड, लोवेल, व्हर्मोंट (तढ) ०५८४७, यु.एस.ए. (णड) येथे ३१ मे २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आणि वैशाख पौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला आहे.

हे महाविहार केवळ एक वास्तू नसून अमेरिकेतील भारतीयांसाठी आणि विशेषतः बहुजन समाजासाठी एक महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र ठरेल. धम्म प्रचारासोबतच डॉ. बाबासाहेबांच्या समता, बंधुता आणि न्याय या विचारांचा प्रसार करणे हा या महाविहाराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. ३१ मे रोजी होणाऱ्या या सोहळ्यासाठी स्थानिक प्रशासनाची परवानगी आणि आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी अमेरिकाभरातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाद्वारे अमेरिकेच्या भूमीवर बुद्ध धम्माचा आणि महामानवाच्या विचारांचा जागर केला जाणार आहे.

## भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तर जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मुंडे

**किनवट** -भारतीय जनता पक्षाच्या किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मारोतराव मुंडे यांची नियुक्ती केल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. त्याच्या नियुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीतील



ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या खरेदीविषयक समस्या मार्गी लागणार असल्याचा विश्वास बहूतांश शेतकऱ्यांनी व्यक्तविला आहे. उद्धवराव मुंडे हे सधन शेतकरी असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच ते संघर्ष करताना दिसतात. त्यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने उशिरा का होईना परंतु जिल्हा चिटणीसपदाची त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आल्याने शेतकऱ्यांसह सर्व स्तरातून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत होतांना दिसते. भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर गणपतराव कदम देळूबकर यांनी २७ मे २०२६ रोजी नियुक्ती केली आहे. नियुक्तीनंतर किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम, भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आणि बहूतांश शेतकऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. उल्लेखनीय म्हणजे किनवट तालुक्यातील ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या भरडधान्य खरेदीचा प्रश्न सद्या ऐरणीवर आला आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापक किनवट कार्यालयाच्या अधिपत्याखाली इस्लापूर येथे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. मध्येच शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा मुद्दा समोर आला आहे. यातील तथ्यता जाणून घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला प्राधान्यक्रम देण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून उद्धवराव मुंडे यांच्याकडे पाहिले जात आहे.

## दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**नांदेड** -देगलूर तालुक्यातील जेतवन शैक्षणिक सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट सुजायतपूर येथे दहा दिवसाच्या श्रामणेर प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला असून पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहापूर, सुजायतपूर नगरीचे प्रतिष्ठित नागरिक शिवाजी कनकंटे यांच्या हस्ते श्रामणेरांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी नांदेड जिल्हा भिक्खू संघाचे अध्यक्ष भंते पय्याबोधी महाथेरो यांच्या शुभेच्छा घेऊन पुढील कार्यक्रमास दिपरत्न भंते यांनी सुरूवात केली. पहिला, दुसरा व तिसरा दिवस उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. पहिल्या दिवसाचा सकाळचा नाष्टा शोभाताई निवडंगे यांनी दिला, तर सकाळचे भोजन आयु. शोभाताई वाघमारे नागपूर यांनी दिले असून संध्याकाळचे भोजन दान आयु. चंद्रकलाताई लेंदे परभणी यांनी दिले. तसेच गावातील सर्व उपासिका ललिता विनोद वाघमारे, त्रिशला राजकुमार वाघमारे मरसांगवी, पूजा गौतम माने टाकळगा, दिक्षा संजय कांबळे, मिणलताई मिलिंद कांबळे, रमाताई संजय पवार, सुरेखा संजय सर्जे यांनी भोजन दान देवून धम्म कार्याला हातभार लावला. या श्रामणेर शिबिराच्या आयोजिका सावित्रीताई शेवाळकर या आहेत. हे श्रामणेर शिबीर दि. २८ मे ते ६ जूनपर्यंत संपन्न होत आहे. श्रामणेर शिबिरामध्ये एकूण २१ मुले-मुली सहभागी झाले असून, त्यांना त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना, धम्म संस्कार, ध्यान साधना तसेच बौद्ध धम्मातील विविध विचारधारांचे प्रशिक्षण दिले जात आहे

## साकेत बुद्ध विहार येथे माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन

**नांदेड** -येथील राजनगर-चंद्रगुप्तनगर साकेत बुद्ध विहारात महामाया महिला मंडळाच्या वतीने आयोजित माता रमाई आंबेडकर स्मृतिदिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रसंगी तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तदनंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मोलाची साथ साथ देणाऱ्या जीवनसंगिनी माता रमाईने केलेला त्याग व त्यांच्या जिवनचरित्रवर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमास शंकराव पवार, गणपत बनसोडे, कांताबाई वाघमारे, अनुसयाबाई कांबळे, पंचशीला रसाळे, कुसुमबाई वाघमारे व सुमनबाई कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या अभिवादन सभेस परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## इंजि.विश्वंभर पवार यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**नांदेड** -राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते इंजि. विश्वंभर पवार यांनी हदगाव येथील शिवसंवाद मेळाव्यात शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. खा. डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केला. हदगाव येथे २८ मे रोजी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पवार यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आ. हेमंत पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख नांदेड रमाकांत मडावी, माजी खा. आनंद परांजपे, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कोहळीकर, आ. आनंद बोंढारकर यांच्यासह जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, गजानन पाटील आदींची उपस्थिती होती. डॉ. पुरुषोत्तम कल्याणकर, चेतन पाटील सोनारीकर, सरपंच संतोष पाटील चिंचाळकर, रवी गेंटेवार, सिद्धू पाटील चिंचाळकर, विजय पा. सोळंके, राष्ट्रवादी शहराध्यक्ष मोहम्मद बुऱ्हाण यांच्यासह ४५ पदाधिकाऱ्यांनी प्रवेश घेतला.



# महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदी राजश्री पाटील बिनविरोध निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नांदेडच्या ज्येष्ठ क्रीडाप्रेमी, यशस्वी खेळाडू आणि संघटक राजश्री पाटील यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे मराठवाड्यासह राज्यातील रिंग टेनिस क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच निवडणुकीत माजी आमदार मोहन जोशी यांची अध्यक्षपदी तर अनिल वरपे यांची महासचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा यापूर्वी माजी खासदार विजय दर्डा यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. आता ही महत्त्वपूर्ण जबाबदारी राजश्री पाटील यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांच्या नेतृत्वगुणांवर, कार्यक्षमतेवर आणि संघटन कौशल्यावर राज्य संघटनेने दाखविलेला विश्वास अधोरेखित झाला आहे.



राजश्री पाटील या बालवयापासूनच क्रीडा क्षेत्राशी जोडलेल्या असून त्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर सात राष्ट्रीय पदके मिळवली आहेत. खेळाडू म्हणून यश मिळवतानाच त्यांनी सहकार, शिक्षण, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २००७ मध्ये नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनची स्थापना झाल्यापासून त्या संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली २०१९ आणि २०२५ या वर्षांत राज्यातील सर्वात मोठ्या रिंग टेनिस स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष मान्यता मिळाली आहे.

रिंग टेनिस या खेळाच्या प्रसार व विकासासाठी त्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे राज्यातील रिंग टेनिस चळवळीला अधिक बळ मिळेल आणि संघटनेच्या कार्याला नवी दिशा प्राप्त होईल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे. राजश्री पाटील यांच्या निवडीबद्दल नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनचे उपाध्यक्ष टी. एन. रामनबैनवाड, सचिव बालाजी सैनवाड तसेच विविध क्रीडा संघटना, खेळाडू, प्रशिक्षक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

खेळातील राष्ट्रीय यश, संघटनात्मक नेतृत्व आणि क्रीडा विकासाची तळमळ यामुळेच राजश्री पाटील यांच्यावर राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील रिंग टेनिस चळवळीला अधिक गती आणि व्यापक दिशा मिळेल, अशी भावना क्रीडा वर्तुळातून व्यक्त होत आहे. या निवडीबद्दल राजश्री पाटील यांनी महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेचे अध्यक्ष मा.आ.मोहन जोशी, महासचिव अनिल वरपे, राज्यातील सर्व पदाधिकारी, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी यांचे आभार मानले. राज्य संघटनेच्या सहकार्याने रिंग टेनिसच्या सर्वांगीण विकासासाठी आणि खेळाडूंना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# आदमपूर परिसरात मान्सूनपूर्व मशागतीत शेतकरी मग्न

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ३० मे -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरातील गावोगावी अनेक शेतकऱ्यांकडून मान्सूनपूर्व मशागतीला वेग आल्याचे शेतोशेती सद्यस्थितीत चित्र पहावयास मिळत आहे.यंदा डिझेल इंधनाचा तुटवडा भासत असल्याने ट्रॅक्टर द्वारे मशागत आणि पेरणी करणाऱ्या शेतकरी व शेती व्यावसायिक ट्रॅक्टर चालकांची पुरती गोची झाल्याने एक नवीन चिंता आवासून उभी टाकली आहे.

परिसरातील शेतकऱ्यांकडून अगदी रामप्रहरापासून व सायंकाळी ट्रॅक्टर किंवा बैलांच्या सहाय्याने शेतीची कामे केली जात आहेत. नांगरणी,वखरणी, कल्टीवेटर, पंजी, कचरा वेचणी,पालवी तोडणे,कचऱ्यास जाळ लावणे,नाला काढणे,कट्टा टाकणे,दगड धोंडे



लावणे,नादुरुस्त बोअरवेल दुरूस्ती आदी कामांना शेत शिवारात वेग आलेला दिसून येत आहे.

आगामी खरीप हंगामाच्या तयारीत असताना शेतकऱ्यांकडून बी बियाणांची,खतांची बाजारात खरेदीची रेलचेल दिसून येत आहे. काही अवधीनंतर बी बियाणांच्या किंमतीत चढ उतार होण्याचे संकेत असल्याने सद्यस्थितीत शेतकरी सोयाबीन बॅगांची खरेदी उरकून घेत आहेत.वातावरणातील बदलाने मान्सून मागे पुढे होईलंच,मात्र पेरणीसाठी शेत शिवारे सज्ज करण्यात शेतकरी,महिला मजूर वर्ग कडक उन्हातही मग्न झाले आहेत.

एकीकडे खरीप हंगाम अगदी तोंडावर येऊन ठेपल्याने डिझेल इंधनाची भारी समस्या निर्माण झाली आहे. परिसरातील शेतकरी व ट्रॅक्टर व्यावसायिकांनी आक्रमक भूमिका अंगीकारून शासन व इंधन पंपचालक व्यावसायिकांप्रती आपला रोष व्यक्त केलेला होता.

डिझेल च्या तुटवड्यामुळे शेतकरी पुन्हा बैल खरेदीकडे वळतील की काय असेही आश्वासक सकारात्मक चित्र तयार होत चालले आहे,अशीही चर्चा परिसरात आपसूक नागरिकांकडून होताना दिसून येत आहे.

# नांदेड जिल्हयामधील दहा कृषी निविष्ठा केंद्राचे परवाने निलंबीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

नायगांव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी, प्रसद्धि झालेल्या बातम्या व तक्रारीच्या अनुषंगाने जल्हिा अधिक्षक कृषी अधकिारी, नांदेड यांनी नायगांव तालुक्यातील सात कृर्षी सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करुन त्यांचे खत परवाने सहा महिन्यासाठी निलंबीत केले आहेत.

सात कृषी नविष्ठिा केद्रांचे नावे पुढीलप्रमाणे (दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा केंद्र, वसंत अग्रो सर्वसि सेंटर, गजानन कृषी सेवा केंद्र, हनुमान कृषी सेवा केंद्र, मातोश्री ग्रो एजन्सी, शविकृपा कृषी सेवा केंद्र, नायगांव) तसेच मे.वर्षा ग्रो ट्रेडर्स, खांबाळा ता.मुदखेड, मे.व्यंकटरमणा कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार, मे.तिरुमला कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार केंद्राचे सुनावणीअंती नदिर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने परवाने नलिंबीत केले आहेत.

तसेच मे.शिवकृपा कृषि वकिास केंद्र , माळकौठा ता.मुदखेड व व्यंकटेश कृषि भांडार नविन मोंढा, नांदेड यांच्या खत वाटपामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटया आढळल्यामुळे पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल झाल्यामुळे यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द केले आहेत.

# तंबाखूमूक्त समाजाकडे एक पाऊल नांदेड डेंटल कॉलेजातर्फे जनजागृती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

३१ मे हा दिवस जागतिक तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात तंबाखू खाणे, सिगारेट ओढणे याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. या प्रसंगी जनजागृती व्हावी म्हणून नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वतीने खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी शहरातील वजीराबाद, रेल्वे स्टेशन, आय.टी.आय चौक येथे या प्रमुख चौकात पथनाट्याच्या माध्यमातून तंबाखू ही शरीरासाठी किती हानिकारक आहे हे दर्शवून दिले.

तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी नांदेड रस्ते डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मागच्या वर्षी भारतातून पहिला नंबर आला होता. आणि यंदाही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नांदेडचे पी.एस.आय. वजीराबाद पोलीस उपनिरीक्षक जयपालसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

आज अनेक तरुण तंबाखूच्या आहारी जन आहेत. तंबाखूचे सेवन केल्याने कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसरोगाचे आजार तसेच तोंडाच्या कॅन्सर विकार होऊ शकतात. तंबाखू सेवनामुळे केवळ स्वतःचेच नव्हे तर कुटुंबाचे आणि समाजाचेही नुकसान होते.

या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तंबाखूच्या वाढत्या समस्येविरोधात, विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाच्या महत्त्वपूर्ण संदेशाचे नागरिकांनी कौतुक केले.

हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष विनोदकुमार श्रीरामवार, व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास डागवार, वरिष्ठ प्राध्यापक व मार्गदर्शक डॉ. राजेश कुमार दासी तसेच डॉ. सुजाता देशमुख व डॉ. सुजेल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला.

# पोलीस ठाण्यांतील पारदर्शकतेसाठी एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढवून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवारचे शहर जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी निवेदन सादर केले.

निवेदनामध्ये पोलीस ठाण्यांमध्ये एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वेळा नागरिकांकडून गुन्हा नोंदविण्यासाठी किंवा तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येतात. यामुळे सामान्य नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कमी होण्याची शक्यता असल्याचे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रस्तावित प्रणालीअंतर्गत प्रत्येक एफआयआर किंवा तक्रार नोंद झाल्यानंतर २४ ते ४८ तासांच्या आत पोलीस अधीक्षक कार्यालयातून फिर्यादीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पोलीस ठाण्यातील वागणूक, कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी, कामकाजाबाबतच्या तक्रारी अथवा सूचना आणि पोलीस सेवेबाबतचे समाधान याविषयी माहिती घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढून भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल. तसेच नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असे फैसल सिद्दीकी यांनी सांगितले. हा उपक्रम नांदेड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवून राज्यासाठी आदर्श मॉडेल निर्माण करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी निवेदनाची दखल घेत सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले. यावेळी निवेदन देताना मोहम्मद अरसलान, शेख नजीब हे उपस्थित होते.

# आ. बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त राहुल देशपांडे यांची संगीत संध्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त एक जून रोजी सायंकाळी ७ वाजता ए. के. संभाजी मंगल कार्यालय नांदेड येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांची संगीत संध्या आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान सकाळी १० वाजता मरळक येथे भव्य कीर्तन आणि आरोग्य तपासणी शिबाराचे आयोजन करण्यात आला आहे.

जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर असणारे आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात विकासाची असंख्य कामे करून लोकांना खरा दिलासा देणारे लोकनायक आ. बालाजीराव कल्याणकर यांचा वाढदिवस १ जून रोजी याही वर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाने आणि धार्मिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त सकाळी दहा वाजता मरळक येथे सकाळी दहा वाजता हरिभक्त परायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याचवेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर ही आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांच्या संगीत संध्या या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ए.के संभाजी मंगल कार्यालयात सायंकाळी सात वाजता संगीत रजनीचा कार्यक्रम रंगणार आहे . तत्पूरी सायंकाळी पाच वाजता आ.बालाजीराव कल्याणकर ए के संभाजी मंगल कार्यालयात जनतेच्या गाठीभेटी घेतील. आयोजित करण्यात आलेल्या संगीत संध्या कार्यक्रमाला आणि मरळक येथे आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळा आणि आरोग्य शिबिराला आणि अभिष्टचिंतन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांनी केले आहे .





**ए. के. संभाजी मंगल कार्यालयात सायंकाळी पाच वाजता आ. कल्याणकर घेणार भेटीगाठी**

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त ए के संभाजी मंगल कार्यालय येथे संगीत संध्या आयोजित करण्यात आली असून सायंकाळी पाच वाजता आ. कल्याणकर जनतेच्या गाठीभेटी घेणार आहेत.

**मरळक येथे कीर्तन आणि आरोग्य शिबिर**

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त मरळक येथील विमलेश्वर मंदिर येथे हरिभक्त परायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा सोहळा सकाळी साडेदहा वाजता आयोजित करण्यात आला असून याच वेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी मोफत भव्य आरोग्य शिबिर ही आयोजित करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठवाड्यातील जलसंपदा विभागाची कार्यालये स्थलांतरित करू नयेत; किशोर शितोळे यांची मंत्र्यांकडे मागणी

### अहमदनगर-नाशिक येथे कार्यालये हलविण्याच्या प्रस्तावाला विरोध • सिंचन, जलव्यवस्थापन आणि विकासकामांवर परिणाम होण्याची भीती

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील जलसंपदा विभागाची महत्त्वाची कार्यालये अहमदनगर आणि नाशिक येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निर्णयामुळे मराठवाड्याच्या विकासावर तसेच सिंचन आणि जलव्यवस्थापनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला आहे.

शितोळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा हा दीर्घकाळापासून दुष्काळाच्या झळा सोसणारा प्रदेश असून येथे जलसंपदा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत विभागातील प्रमुख कार्यालये अन्यत्र हलविल्यास स्थानिक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेणे कठीण होईल. तसेच शेतकरी, नागरिक आणि विविध विकासकामांशी संबंधित घटकांना प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो.



मराठवाड्यात अनेक सिंचन प्रकल्प, धरणे आणि जलसंधारणाशी संबंधित योजना कार्यान्वित आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वरिष्ठ अधिकारी आणि अभियंते स्थानिक पातळीवर उपलब्ध असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. कार्यालयांचे स्थलांतर झाल्यास प्रशासकीय समन्वयात अडथळे निर्माण होऊन प्रकल्पांच्या गतीवर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

मराठवाड्याच्या जनभावनांचा आदर करून जलसंपदा विभागाची कार्यालये विभागातच कायम ठेवावीत आणि स्थलांतराचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी शितोळे यांनी निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.

चौकट

शितोळे यांचा इशारा मराठवाड्यातील जलसंपदा विभागाची कार्यालये बाहेर हलविण्यात आल्यास स्थानिक प्रशासन, सिंचन प्रकल्पांचे नियोजन, जलव्यवस्थापन आणि विकासकामांच्या समन्वयावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने मराठवाड्याच्या हिताचा विचार करून हा निर्णय पुनर्विचारासाठी ठेवावा, अशी भूमिका किशोर शितोळे यांनी मांडली आहे.

## एमजीएमच्या वतीने आयोजित सीआयएसएफ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे सीआयएसएफच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले 'सॉफ्ट स्किल्स अँड कम्युनिकेशन ट्रेनिंग' यशस्वीपणे संपन्न झाले.



या प्रशिक्षण कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, सीआयएसएफचे डेप्युटी कमांडंट गोविंद कुलकर्णी, असिस्टंट कमांडंट अजय कुमार, मुख्य वित्त अधिकारी भारत पेंटावार, मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.मानसी करजगावकर, प्राध्यापिका डॉ.रिहाना सय्यद, सीआयएसएफचे अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते.

आजच्या तणावपूर्ण आणि आव्हानात्मक सुरक्षा व्यवस्थेमध्ये प्रभावी संवादकौशल्य, भावनिक बुद्धिमत्ता, मानसिक स्थैर्य आणि व्यावसायिक वर्तन यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ होते. त्यांनी सुरक्षा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी प्रभावी संवाद, सहानुभूती, मानसिक सक्षमता आणि सकारात्मक वर्तनकौशल्यांची गरज अधोरेखित केली.

या प्रशिक्षण कार्यक्रमात मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. मानसी करजगावकर तसेच प्राध्यापिका डॉ.रिहाना सय्यद यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तणाव व्यवस्थापन, भावनांवर नियंत्रण, आंतरवैयक्तिक संवाद, जनसंपर्क कौशल्ये, व्यावसायिक वर्तन आणि विमानतळ सुरक्षा व्यवस्थेतील मानवी संवादाचे मानसशास्त्र या विषयांवर सविस्तर माहिती दिली.

## हुतात्मा विश्वनाथ राजहंस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोयगाव येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० मे : येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत २१ मे २०२६ पासून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.२०२६ या वर्षासाठी सोयगाव संस्थेत वेल्डर(WELDER)=२० जागा

कोपा(COPA) =२४ जागा

प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. प्रवेशाबाबत माहिती देण्यासाठी सोयगाव आयटीआय मध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन प्रवेश अर्जाची प्रिंट व प्रमाणपत्रासह प्रत्यक्ष संस्थेत जाऊन आपला अर्ज कन्फर्म करावा.१ जून २०२६ पासून पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्था निहाय विकल्प आणि प्राधान्य (Option form) भरण्याची प्रक्रिया सुरू होईल.

https://admission.dvet.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेश अर्ज करता येईल असे आवाहन प्रचार्य पी.एस. म्हस्के यांनी केले आहे.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा; बाजार वाहेगावात 'ज्ञानांकुर' अभ्यासिकेचे उद्घाटन

### लोकसहभागातून साकारलेल्या उपक्रमाचे जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरिया यांच्या हस्ते लोकार्पण

बदनापूर : बदनापूर तालुक्यातील बाजार वाहेगाव येथे ग्रामस्थ, विद्यार्थी आणि अभ्यासिका समितीच्या संयुक्त प्रयत्नांतून उभारण्यात आलेल्या 'ज्ञानांकुर' अभ्यासिकेचे उद्घाटन जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरिया यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक अभ्यासाचे वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही अभ्यासिका उभारण्यात आली आहे.

उद्घाटनप्रसंगी विद्यार्थिनींनी औक्षण करून डॉ. कनवरिया यांचे स्वागत केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या वतीने उपसरपंच अंकुश काळे व ग्रामविकास अधिकारी गायकवाड यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भारतीय संविधानाची प्रत आणि रोप देऊन डॉ. कनवरिया यांचा सत्कार केला. ग्रामस्थांनीही



त्यांचा विशेष सन्मान केला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कनवरिया यांनी अभ्यासिका समिती, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका ही केवळ वाचनाची जागा नसून त्यांची स्वप्ने साकार करण्याचे केंद्र ठरू शकते, असे सांगत त्यांनी या उपक्रमाला महत्त्वाचा पायलट प्रकल्प म्हणून गौरविले.

कार्यक्रमात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन आयकर विभागात वर्ग-दोन अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आस्था इंगोले हिचा तसेच नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. याचवेळी गावातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. त्यामुळे कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब नरवडे यांनी वर्षभरातील उपक्रमांचा आढावा घेतला. अभ्यासिका उभारणीसाठी ग्रामस्थांनी दिलेले योगदान, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा आणि भविष्यातील नियोजन यांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर काळे व विष्णू सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवाजी चव्हाण यांनी मानले. अशा लोकसहभागातून उभारलेल्या अभ्यासिकेमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार अभ्यास सुविधा उपलब्ध होणार असून स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी त्यांना सक्षम व्यासपीठ मिळणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आरंभ कोचिंग क्लासेसच्या संचालकांचा पालकांकडून सत्कार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० मे : येथील आरंभ कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थ्यांनी यंदाच्या एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याची परंपरा कायम राखली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणारे क्लासेसचे संचालक व शिक्षक प्रा.योगेश काळे व प्रा.प्रणय कुलकर्णी यांचा जय मातादी गिफ्ट शॉपी मध्ये पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पालकांनी शिक्षकांच्या मेहनतीचे व विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पित वृत्तीचे कौतुक केले.

कार्यक्रमात यशस्वी विनय मंडवे या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन,नियमित सराव व पालकांच्या पाठिंब्याला दिले. यावेळी उपस्थित जय मातादी गिफ्ट शॉपी ची संचालक सतीश मंडवे,सोनूभाऊ मंडवे,कृष्णा शेवाळकर, योगेश बोखारे,जय रुद्रेश्वर मोबाईल शॉपी चे संचालक राहुल सोनवणे उपस्थित होते मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत अधिक मेहनत घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास पालक,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्नेहा-सिद्धूच्या पुनर्मिलनासाठी चाहत्यांची जोरदार मागणी; कलाकारांच्या प्रतिक्रियेची चर्चा



छत्रपती संभाजीनगर : झी टीव्हीवरील 'गंगा माई की बेटियाँ' या लोकप्रिय मालिकेने भावनिक कथानक आणि प्रभावी अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. मालिकेतील सिद्धू आणि स्नेहा यांच्या नात्यात आलेल्या दुराव्यामुळे चाहते सध्या भावुक झाले असून सामाजिक माध्यमांवर त्यांना पुन्हा एकत्र आणण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

मालिकेच्या सध्याच्या कथानकानुसार सिद्धू पूर्वीसोबत विवाहबंधनात अडकण्याच्या तयारीत आहे, तर स्नेहा शंतनूसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करणार आहे. त्यामुळे या लोकप्रिय जोडीचे कायमचे विभक्त होणे चाहत्यांना मान्य नसून त्यांचे पुनर्मिलन व्हावे, अशी भावना चाहत्यांकडून व्यक्त केली जात आहे.

या मागणीला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल प्रतिक्रिया देताना अमनदीप सिधू म्हणाली की, प्रेक्षकांचे प्रेम आणि पाठिंबा पाहून ती भावुक झाली आहे. चाहत्यांचा उत्साह कलाकारांसाठी प्रेरणादायी असून पुढील कथानकाबाबत तीदेखील उत्सुक असल्याचे तिने सांगितले. शिझान खाननेही चाहत्यांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सिद्धू आणि स्नेहाच्या प्रवासाशी प्रेक्षक इतके भावनिकरित्या जोडले गेले आहेत, हे पाहून आनंद होत असल्याचे तो म्हणाला. आता प्रेक्षकांच्या या भावनिक मागणीची दखल निर्माते आणि वाहिनी घेणार का, तसेच सिद्धू-स्नेहाचे पुनर्मिलन घडवून आणणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दुर्घटनेला खुणवतेय तहसीलची पाण्याची टाकी

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- तालुक्यात सध्या चर्चा आहे.पैठण महसूल विभागाच्या गैर कारभारला वैतागून वृद्ध शेतकरी दांपत्याने तहसील कार्यालयासमोरील पाण्याची टाकी जलकुंभावर चढून दुसऱ्यांदा शोले स्टाईल आंदोलन केल्याची.ही घटना प्रशासनासाठी बेशरमीची बाब आहे.परंतु प्रशासनाच्या निष्काळजी पणाने या पाण्याच्या टाकीवर भविष्यात अपघात होण्याची चिन्हे आहेत.

वारंवार अर्ज, भानगडी करून ही महसूल दफ्टरी काम होत नाही म्हणून तालुक्यातील नागरिक असे आंदोलन करण्याची पवित्रा घेत आहेत. पैठण तहसील समोर ७ लक्ष लिटर पाणी क्षमता ही महाकाय पाण्याची टाकी नगर परिषदेची असून येथून जवळच्या परिसरात पाणी पुरवठा केला जातो.याठिकाणी टाकीची निगा राखण्याची सर्वस्व जबाबदारी ही नगर परिषदेचे आहे. ८० फूट उंच असलेल्या या पाण्याच्या टाकीचे काम जीर्ण होत असून वरील कठडे पडले आहे. त्यावर जाणाऱ्या पायऱ्या मोडकळीस आल्या आहेत.अश्या परिस्थितीत प्रशासनाच्या कारभारला वैतागून धोकादायक पाण्याच्या टाकीवर



जाऊन आंदोलन करणे एखाद्याला महागात पडू शकते ज्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहणार आहे. तहसील कार्यालयातील शिपाई. कोतवाल, पाणी पुरवठा करणारे कर्मचारी यांची नजर चुकवून टाकीवर हताश झालेले लोक चढत आहेत आणि प्रशासन निर्लज्ज पनाने या परिस्थिती कडे बघत आहे. मुळात ही परिस्थिती प्रशासनानेच निर्माण केल्याचे दिसत आहे. असेच प्रकार सुरु राहणार असतील तर याठिकाणी मोठे अपघात होण्याची चिन्हे आहेत. पाण्याच्या टाकीला वरच्या बाजूस कठडे करून खालच्या बाजूस सुरक्षा भिंत बांधून त्याठिकाणी २४ तास वॉचमनची व्यवस्था केल्यास भविष्यात असे प्रकार घडणार नसल्याचे बोलले जात आहे.

**मुळात या महाकाय धोकादायक जलकुंभावर चढून आंदोलन करण्याची ही नवीन घटना नसून २२ सप्टेंबर २०२३ ला शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम व नुकसान भरभपाई मिळत नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते ज्ञानराज उर्फ माऊली मुळे यांनी शेकऱ्यांसह याठिकाणी शोले स्टाईल आंदोलन केले होते. आणि आता कारकीन शिवारातील गट क्रमांक ३०५ मध्ये चुकीचा फेरफार रद्द करा म्हणून ढोरकिन येथील शेतकरी वृद्ध दांपत्य शोभा बबन कुदळे वय ६० वर्षे, बबन मारोती कुदळे वय ६३ वर्षे यांनी दिनांक २५ मे आणि २९ मे. २०२६ रोजी दुसऱ्यांदा महसूल प्रशासनाचा निषेध करत आंदोलन केले. या दोन्ही आंदोलना वेळी पोलीस प्रशासनाची चांगलीच कवायत झाली.**

## पाण्यासाठी रात्रभर अंबाडी प्रकल्पावर ठिय्या; नवीन मोटर्स बसवून पाणीपुरवठ्याला दिलासा

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.३० मे - महिन्यातील तीव्र उन्हाळ्यामुळे अंबाडी प्रकल्पातून होणारा पाणी उपसा कमी झाल्याने कन्नड शहरातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली होती. नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने गैरसोय वाढली होती. या पार्श्वभूमीवर लोकनियुक्त नगराध्यक्ष फरीन बेगम यांचे पती माजी उपनगराध्यक्ष,नगरसेवक अब्दुल जावेद यांनी अंबाडी प्रकल्पावर दि.28 रोजी रात्रभर ठिय्या देत नवीन मोटर्स बसवून घेण्याचे काम पूर्ण करून घेतले.

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी अब्दुल जावेद यांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांसोबत रात्रभर उपस्थित राहून कामाची पाहणी केली. धरणातील पाणी उपसा वाढविण्यासाठी नवीन मोटर्स बसविण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

याबाबत बोलताना अब्दुल जावेद म्हणाले, "कन्नडकरांनी माझ्यावर विश्वास दाखविला आहे. नागरिकांना पाण्यासाठी त्रास होऊ नये, हे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे स्वतः उपस्थित राहून हे काम पूर्ण करून घेतले."

दरम्यान, नगरपालिका कर्मचारी बाजीराव थोरात, सुनील भाले यांच्यासह माजी नगरसेवक असद पवार आणि राजू शेख (राजू कमिटी) यांनीही रात्रभर उपस्थित राहून कामात सहभाग घेतला.

नवीन मोटर्स बसविल्यानंतर शहराच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी दाखविलेल्या तत्परतेबद्दल अब्दुल जावेद यांच्या कार्याचे शहरात कौतुक होत आहे.

## कॅप्टन भोंदू बाबाचा पर्दाफाश करणार 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'

छत्रपती संभाजीनगर - समाजात घडणाऱ्या घटनांचे पडसाद कित्येकदा रुपेरी पडद्यावरही उमटतात आणि चित्रपटांच्या माध्यमातून काही अप्रकाशित पैलू उजेडात येतात. आजवर समाजात घडलेल्या अनेक घटना आणि प्रकरणांवर आधारित वास्तवदर्शी चित्रपट बनले आहेत. समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम करणाऱ्या या चित्रपटांनी सरकारी व्यवस्थांनाही धारेवर धरले आहे. नुकतीच घोषणा झालेल्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटातही संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या अशाच एका गाजलेल्या प्रकरणाचा पर्दाफाश करण्यात येणार आहे. मोशन पोस्टर प्रदर्शित करून 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. २ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असल्याचे मोशन पोस्टरवर घोषित करण्यात आले आहे.

सोशल मीडियावर मोशन पोस्टर प्रदर्शित करून आगामी 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. जैन फिल्म प्रोडक्शन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी देवेंद्र भट, सुर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे यांनी स्वीकारली आहे. वास्तवदर्शी कथानकावर आधारलेल्या या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक स्वरूप बी. सावंत यांनी एक आव्हानात्पक पाऊल टाकले आहे. 'आता सगळं उघड होणार...!' हि टॅगलाईन हा चित्रपट अनेकांचा पर्दाफाश करणार असल्याचे संकेत देण्यासाठी पुरेशी आहे. आता हा चित्रपट कोणकोणत्या गोष्टी उघड करतो, ते प्रदर्शनानंतरच समजेल. या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर अनेकांचे सभ्यतेचे मुखवटे आपोआप गळून पडणार आहेत. या चित्रपटात कॅप्टन भोंदू बाबाची गोष्ट पाहायला मिळणार आहे. प्रदर्शित करण्यात आलेल्या पोस्टरवर एक पाठमोरी व्यक्ती उभी असल्याचे पाहायला मिळते. या व्यक्तीने पाठीमागे घेतलेल्या हातात पाचशे रुपयांच्या नोटांची बंडल्स आहेत. याने कुर्ता-पायजमा आणि जॅकेट असा सभ्य गृहस्थांचा पोषाख परिधान केलेला आहे. त्याच्या चहूबाजूला क्राईम सीनच्या पिवळ्या फिती बांधलेल्या आहेत. त्याच्या समोरील भिंतीवरील काही फोटोंमध्ये 'प्रश्नचिन्ह' आहे. एकावर 'नाशिक' आणि दुसऱ्यावर 'भोंदूबाबा' असे लिहिले आहे. समोरील टेबलवर डाव्या बाजूला तांब्याचा पाण्याचा जग आणि भांडे आहे, तर उजव्या बाजूला पुस्तके, चहाचा ग्लास आणि एलिश हनी आहे. हे सर्व चित्र पाहिल्यावर हा चित्रपट कोणत्या कॅप्टन भोंदूबाबाच्या कृत्यांचा पर्दाफाश करणार आणि कोणाची एपस्टिन फाईल ओपन करणार हे चाणाक्ष मराठी प्रेक्षकांना वेगळे सांगण्याची गरज नाही.

# महामार्गावर चुकीच्या दिशेच्या दुचाकीमुळे अपघात; मुंबईतील कुटुंबासह चौघे जखमी

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.३० मे - धुळे–सोलापूर महामार्गावरील कन्नड साखर कारखान्याच्या मागील बाजूस असलेल्या पेट्रोल पंपासमोर शनिवारी सकाळी सुमारे ११.३० वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातात चौघेजण जखमी झाले. चुकीच्या दिशेने येणारी दुचाकी चुकविण्याच्या प्रयत्नात थार जीपचा अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, थार जीप (क्र. एमएच २४ बीएच ०२३९) मधून हितेश सक्रे (वय ४२), प्रिया हितेश सक्रे (वय ३५) व रुजूल हितेश सक्रे (वय १५, सर्व रा. चेंबूर, मुंबई) हे कुटुंबीय उज्जैन येथे दर्शनासाठी जात होते. कन्नड साखर कारखान्याच्या मागील बाजूस असलेल्या पेट्रोल पंपाजवळ आल्यानंतर विरुद्ध दिशेने दुचाकी (क्र. एमएच ०२ एएस ८६७३) येताना दिसली.

या दुचाकीवर मुक्तार शब्बीर शेख (वय ३०, रा. मक्रणपूर) व दीपक कडूबा मोरे (वय २५, रा. दाभाडी) हे प्रवास करीत होते. दुचाकी चुकीच्या दिशेने येत असल्याने तिला चुकविण्याच्या प्रयत्नात थार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला.

या अपघातात थारमधील प्रवासी तसेच दुचाकीवरील दोघे जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे

## मराठी विषयात संजय नामदेवराव आठवले यांना पीएच.डी प्रदान



नांदेड : येथील संजय नामदेवराव आठवले यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत मराठी या विषयात पीएच.डी प्रदान केली आहे. त्यांच्या व्हायव्यासाठी भाषा संकुलाचे संचालक व चेअरमन प्रो. डॉ. पृथ्वीराज तौर, मार्गदर्शक प्रो. डॉ. दत्ता शिंदे व बाह्य परीक्षक डॉ. दिनेश वाघुंबरे बाह्य परीक्षक हे उपस्थित होते.

संजय आठवले यांनी प्रो. डॉ. दत्ता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आसाराम लोमटे यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास' या मराठी विषयात संशोधन कार्य पूर्ण केले आहे.त्याबद्दल त्यांचे डॉ. वैजनाथ अनमूलवाड, डॉ. पी. विठ्ठल, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. रमेश ढगे, डॉ. शैलेजा वाडीकर डॉ. राजेंद्र गोणारकर, प्रा.हरी पाटोडे, डॉ. सखाराम लोखंडे, प्रा.भास्कर होणसांगळे, संघरत्न आठवले, शिवराज वडझे, प्रा. विशाल बोरगावकर, प्रा.बसवंता भोरगे, प्रा. कोमल भरणे, प्रज्ञा आटकोरे, प्रा.प्रियदर्शनी सोनसळे यांनी अभिनंदन केले आहे.